


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026
रविवार, दि. ०९ नोव्हेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : 009 | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com

# तेजवानीचे परदेशात पलायन?

## कोरेगाव पार्क, बोपोडी जमीन व्यवहार प्रकरणांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

उपमुख्यमंत्री अजित पवारांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या कोरेगाव पार्क आणि बोपोडी येथील जमीन व्यवहार प्रकरणांतील कुलमुख्त्यारधारक शीतल किसनचंद तेजवानी हिने परदेशात पलायन केल्याची चर्चा आहे. मात्र, तेजवानी पसार झाल्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दुजोरा दिलेला नाही. या दोन्ही प्रकरणांचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे. कोरेगाव पार्क येथील जमीन व्यवहार प्रकरणात बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पार्थ पवार यांच्या 'अमोडिया' कंपनीचा बोपोडीतील आणखी एक जमीन व्यवहार उघडकीस आला. बोपोडी आणि कोरेगाव पार्क या दोन्ही प्रकरणांत तेजवानी हिच्या विरुद्ध गुन्हे दाखल झाले आहेत. पोलीस तिचा शोध घेत आहेत. तिने परदेशात पलायन केल्याची चर्चा आहे. मात्र, याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दुजोरा दिलेला नाही. 'हे प्रकरण फसवणुकीचे आहे. फसवणूक, अपहार प्रकरणात आरोपी अटकपूर्व जामीन मिळवू शकतात. या प्रकरणांतील तेजवानी ही परदेशात पसार झाल्याची चर्चा आहे. मात्र, अशा प्रकारची कोणतीही माहिती मिळालेली नाही', असे आर्थिक गुन्हे शाखेतील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. 'या जमीन गैरव्यवहार प्रकरणांचा तपास पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे. या प्रकरणांतील कागदपत्रे शासकीय विभागाकडून मागविण्यात आली आहे. या कागदपत्रांची पडताळणी करून पुढील कारवाई करण्यात येणार आहे' अशी माहिती आर्थिक गुन्हे शाखेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बोलताना दिली.



शेतकऱ्यांना सगळे फुकट पाहिजे असे म्हणणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मुलाला मात्र हातपाय न हलवता बेकायदारीत्या कोट्यवधी रुपयांची जमीन फुकटात हवी आहे, असे म्हणत शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शनिवारी टीका केली. देवेंद्र फडणवीस हे भ्रष्टाचाराला 'निर्दोषत्व' देणारे मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे याही प्रकरणात काहीच होणार नाही. अशी प्रकरणे जिरवण्यासाठीच सत्तेत येण्याकरिता या सरकारला मतचोरीशिवाय पर्याय नाही, असे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

### 'मुख्यमंत्र्यांनी वस्तुस्थिती पुढे आणावी'

अकोला : पुण्यातील कोरेगाव पार्क जमीन प्रकरण गंभीर विषय असल्याचे मुख्यमंत्री सांगतात. या प्रकरणात त्यांनी सखोल चौकशी करून वास्तव चित्र समाजापुढे ठेवले पाहिजे. हे काम त्यांनीच करण्याची अपेक्षा आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी आज येथे व्यक्त केले. शरद पवार म्हणाले, पुण्यातील जमीन प्रकरणात शासनाने वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती गठीत केली. त्या समितीला एक महिन्याची मुदत दिली आहे. चौकशीतून नेमके काय समोर येते, ते बघावे लागेल प्रशासन, राजकारण आणि कुटुंब यात फरक आहे. राजकारणात कुटुंब आणत नाही, ही आमची विचारधारा आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

# स्टार प्रचारकांची संख्या आता २० ऐवजी ४० पर्यंत वाढविली

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या प्रमुख प्रचारकांच्या (स्टार प्रचारक) संख्येची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाने आता २० वरून ४० केली आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असलेली प्रमुख प्रचारकांची मर्यादा वाढवून ४० करण्यात यावी, अशी मागणी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी आयोगाच्या कार्यालयात १४ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत केली होती. 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' मधील परिच्छेद २६ मध्ये प्रमुख प्रचारकांसंदर्भातील तरतुदी आहेत. त्याआधारे आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेऊन ही संख्या वाढविण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांना प्रमुख प्रचारकांची यादी संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर करावी लागेल.

# आजीशेजारी झोपलेली असताना अपहरण आणि बलात्कार

**पश्चिम बंगाल : (समर्थ गांवकरी)**

महिला अत्याचाराच्या घटनेने पश्चिम बंगाल राज्य पुन्हा एकदा हादरले आहे. पश्चिम बंगालमधील हुगळी येथे, चार वर्षांच्या मुलीचे तिच्या पालकांच्या शेजारी झोपलेली असताना कथितपणे तिचे अपहरण करण्यात आले आणि त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना तारकेश्वर रेल्वे स्टेशनच्या परिसरात शुक्रवारी घडली. येथे या चिमुरडीचे कुटुंबाने आश्रय घेतला होता. या प्रकरणी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, कुटुंबाने आरोप केला की मुलीला तिची मच्छरदाणी कथितपणे फाडून ती झोपेत असतानाच उचलून नेण्यात आले आणि नंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आले. पहाटे मूल बेपत्ता असल्याचे आढळून आल्यानंतर एकच खळबळ उडाली. अनेक तास शोध घेतल्यानंतर नातेवाईकांना ती मुलगी दुपारी स्टेशनच्या बाजूला एका गटाराच्या जवळ आढळून आली. "मूल तिच्या आजीच्या शेजारी मच्छरदाणीत झोपले होते, तेव्हा आरोपीने कथितरित्या मच्छरदाणी कापून तिला उचलून नेले. अनेक तास शोध घेतल्यानंतर, ती एका गटाराजवळ रक्तस्राव होत असलेल्या अवस्थेत, विवस्त्र आणि गालावर चावल्याच्या खुणांसह आढळून आली. अनेक तास उपचार करूनही, तिच्या गुप्तांगातून अजूनही रक्तस्राव होत आहे," असे भाजपच्या आरामबाग जिल्ह्याच्या सचिव पर्णा आदक यांनी सांगितले. पोलिसांनी या मुलीला पुढील वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल केले, यावेळी भाजपा नेते आणि कार्यकर्त्यांनी आंदोलन करत परिसरात गर्दी केली. त्यांनी पोलीस आणि डॉक्टरांवर निष्काळजीपणाचा आरोप केला.

- विवस्त्र आणि गालावर चावल्याच्या खुणांसह आढळली ४ वर्षांची चिमुरडी






# अभिषेक- शुबमनच्या जोडीचा रेकॉर्ड! असा पराक्रम करणारी ठरली पहिलीच जोडी

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये ५ टी-२० सामन्यांची मालिका पार पडली. या मालिकेतील पहिला आणि शेवटचा सामना पावसामुळे रद्द झाला. तर मालिकेतील २ सामने जिंकून भारतीय संघाने ही मालिका २-१ ने खिशात घातली. या विजयासह भारतीय संघाने ऑस्ट्रेलियात जाऊन टी-२० मालिका जिंकण्याची मालिका सुरू ठेवली. या मालिकेत भारतीय संघाकडून डावाची सुरूवात करणाऱ्या अभिषेक शर्मा आणि शुबमन गिल यांनी मिळून धावांचा पाऊस पाडला. हे दोन्ही फलंदाज या मालिकेत सर्वाधिक धावा करणारे फलंदाज ठरले.

दरम्यान या जोडीच्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद झाली आहे. भारतीय संघाकडून डावाची सुरूवात करताना अभिषेक शर्माने दमदार सुरूवात करून दिली. त्याची प्लेअर ऑफ द मॅच म्हणून निवड करण्यात आली. तर दुसरीकडे शुबमन गिलला हवी तशी कामगिरी करता आली नव्हती.





# पार्थ पवार यांचे एफआयआरमध्ये नाव का नाही?

- पुणे व मुंबईतील जमीन गैरव्यवहारांची श्वेतपत्रिका काढावी काँग्रेस हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांनी व त्यांच्या नातेवाईकांनी राज्य लुटण्याचा सपाटा लावला असून मुंबई, पुण्यासह राज्यातील कोट्यवधी रुपयांचे भूखंड कवडीमोल दराने लाटले जात आहेत. या सर्व जमीन गैरव्यवहारांची श्वेतपत्रिका काढावी आणि हिवाळी अधिवेशनात एक दिवस सरकारने चर्चा करावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी शनिवारी येथे केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांचे नाव पुण्यातील जमीन गैरव्यवहारप्रकरणी पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या प्राथमिक माहिती अहवालात (एफआयआर) का नाही, असा सवाल सकपाळ यांनी केला आहे. महायुती सरकार गेंड्याच्या कातडीचे असून बेशरमपणाचा कळस गाठला असल्याची टीकाही त्यांनी केली.

पार्थ पवार यांच्या पुण्यातील जमीन गैरव्यवहारप्रकरणी सकपाळ यांनी टिळकभवन प्रदेश कार्यालयात पत्रकार परिषद घेवून राज्य सरकारवर टीकास्त्र सोडले. पार्थ पवार प्रकरणी भ्रष्टाचार उघड झाल्यावर जमीन खरेदी व्यवहार रद्द करण्यात आला. ही चोरीची कबुलीच असून सरकार पार्थ पवारांवर कारवाई का करीत नाही.?त्यांच्या अमेरिडाय कंपनीने बोपोडीतील ॲग्रीकल्चर डेअरीची जमीन बोगस कागदपत्रे तयार करुन हडपली. या व्यवहारासाठी एका साखर कारखान्यातून पैसे आले. ते कोणी व कसे दिले, याची उत्तरे जनतेला मिळाली पाहिजेत. सरकार चौकशी समिती नेमून वेळकाढूपणा करीत असल्याचा आरोप सकपाळ यांनी केला.

भाजप नेते व केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात जैन बोर्डिंगची जमीन लाटली. तो गैरव्यवहार उघड होताच व्यवहार रद्द झाला. याप्रकरणी धर्मादाय आयुक्तांवर काय कारवाई झाली?अदानीला मुंबईत शेकडो एकर जमीन फुकटात दिली गेली. भाजपच्या मुंबईतील प्रदेश कार्यालयासाठी शासकीय जमिनीचा गैरव्यवहार झाला. मोहित कंभोज याला झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या जमिनी दिल्या गेल्या आहेत, पुण्यात रिंगरोडच्या जमीन अधिग्रहणात मोठा गैरव्यहार झाला. समृध्दी महामार्गात कोणाची समृद्धी झाली ? या सर्व जमीन व्यवहारांची श्वेतपत्रिका काढण्याची मागणी सकपाळ यांनी केली.

### 'वंदे मातरम्' धार्मिक दंगे करण्यासाठी नाही...

राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला १५० वर्ष झाल्यानिमित्त भारतीय जनता पक्ष देशभरात विविध कार्यक्रम घेत आहे. पण भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने 'वंदे मातरम्'ला नेहमीच विरोध केला आहे. संघाच्या शाखेत हे गीत कधीच गायले नाही, 'वंदे मातरम्' हे स्वातंत्र्य संग्रामात गायले जात होते. या गीताला मोठा त्याग व बलिदानाचा इतिहास आहे. भाजपने आता इतक्या वर्षांनंतर ते स्वीकारले याचा आम्हाला आनंदच आहे. पण आता भाजपा या गीताचा वापर राजकीय हेतूने करत आहे. हे पवित्र गीत धार्मिक वा जातीय दंगे घडवण्यासाठी तसेच सामाजिक शांतता भंग करण्यासाठी नाही, असे नमूद करीत भाजपचे 'वंदे मातरम्' गीतावरचे प्रेम हे पुतणा मावशीचे असल्याचा आरोप सकपाळ यांनी केला.






# नक्षलमुक्त भारताकडे निर्णायक पावले



## संपादकीय

नक्षलवादाचा उगम १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी येथे झालेल्या शेतकरी उठावातून झाला. याच चळवळीचे रूपांतर पुढे प्रतिबंधित कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओइस्ट) या सशस्त्र उठावात झाले. २०००च्या दशकात या हिंसक चळवळीचा प्रभाव २० राज्यांतील तब्बल १८० जिल्ह्यांपर्यंत पसरला होता. स्फोट, घातपात, शासकीय अधिकारी आणि पोलिसांवरील हल्ल्यांत हजारो लोक मृत्युमुखी पडले. नक्षल हल्ल्यांमुळे दरवर्षी सुमारे ₹२,००० कोटींचे थेट नुकसान होते, असा अंदाज आहे. नक्षलवाद्यांनी हल्ले करून रस्ते, पूल, रेल्वे, वीजवाहिन्या, शाळा आणि खाण यंत्रणांना लक्ष केले होते. गेल्या २५ वर्षांत हे नुकसान ₹५०,००० कोटींहून अधिक झाले आहे. याशिवाय विकास प्रकल्प, खंडणी आणि सुरक्षा खर्च यामुळे दरवर्षी जवळपास ₹२०,००० कोटींचा अप्रत्यक्ष आर्थिक परिणाम झाला असून, एकत्रित नुकसान सुमारे ₹५ लाख कोटी इतके ठरते. वनतोड, खनिज उत्खननातील अडथळे यामुळेही अब्जावधी रुपयांचे नुकसान झाले आहे. गृह मंत्रालयाने २०२४ मध्ये 'ऑपरेशन कागर' (किंवा 'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट') सुरू केले. यात 'शरणागती किंवा मृत्यू' या धोरणानुसार नक्षलवादाचे संपूर्ण निर्मूलन करण्याची योजना आहे. ऑपरेशनमध्ये सुरक्षा दलांनी नक्षल नेत्यांची ठिकाणे उद्ध्वस्त करणे, शस्त्रसाठे आणि आयईडी युनिट्स नष्ट करणे, तसेच कट्टर माओवादी नेत्यांचा खात्मा करण्यावर या अभियानात भर देण्यात आला. परिणामी, एकेकाळी देशभर पसरलेला नक्षलवाद आता दंडकारण्यातील मोजक्या ठिकाणापुरता सीमित झाला आहे. २००० च्या दशकात १८० जिल्ह्यांमध्ये सक्रिय असलेली ही चळवळ आज फक्त ११–१२ जिल्ह्यांपुरती राहिली आहे. त्यातही फक्त ६ जिल्हे 'अत्यंत प्रभावित' म्हणून घोषित आहेत. बस्तर, सुकमा, कंकेर, नारायणपूर येथेही यंदा दिवाळी शांततेत साजरी झाली. एकेकाळी 'रेड झोन' म्हणून ओळखले जाणारे हे भाग आता शांत होत आहेत. नक्षली चळवळीच्या विरोधात यावर्षी मोठ्या कारवाया झाल्या. छत्तीसगडमध्ये सीपीआय (माओवादी)चा सर्वोच्च कमांडर नंबाला केशव राव (बासवराजू) व २६ जण ठार (२१ मे), गारीयाबंदमध्ये केंद्रीय समिती सदस्य मनोझ ऊर्फ मोडेम बालकृष्ण व ९ जण ठार (११ सप्टेंबर), सुकमा व बीजापूर भागातील चकमकीत २५ हून अधिक नक्षलवादी मारले गेले (ऑक्टोबर) या त्यातील प्रमुख. २०२५ च्या ऑक्टोबरपर्यंत ३३३ नक्षलवादी ठार आणि १००० जणांना अटक, तर केवळ मे-जूनमध्ये ६३१ जण निष्प्रभ करण्यात आले. २०१४ पासून आतापर्यंत १०,००० हून अधिक नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली आहे. मागील २० महिन्यांत १६३६ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. त्यात ६१ गडचिरोलीचे वरिष्ठ नेते होते. २०२५ मध्येच १०००हून अधिक शरणागती झाल्या; त्यात केवळ ७५ तासांत ३०३ जणांनी आत्मसमर्पण केले. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्रातील गडचिरोलीत माओवादी चळवळीचा दीर्घकालीन सूत्रधार आणि प्रवक्ता मल्लोजुला वेणुगोपाल राव ऊर्फ सोनू (६९) याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर ६० जणांसह आत्मसमर्पण केले. त्याच दिवशी कंकेर जिल्ह्यात ५० आणि सुकम्यात २७ माओवादी (त्यात १० महिला) यांनी शस्त्रे खाली ठेवली. यासंदर्भातील केंद्र सरकारचा दृष्टिकोन फक्त सैनिकी नाही. एकीकडे नक्षलवाद्यांना आत्मसमर्पणासाठी ₹२.५ ते ₹५ लाखांच्या पुनर्वसन योजना दिल्या जात आहेत; तर दुसरीकडे शिक्षण, आरोग्य, रस्ते व रोजगार योजनांवर भर दिला जात आहे.

नक्षलग्रस्त भागात २०२४ पासून ६५ नव्या सुरक्षा छावण्या उभारण्यात आल्या. ५० हून अधिक शाळा व आरोग्य केंद्रे पुन्हा सुरू करण्यात आली. 'नियाद नेल्लनार' योजनेतून दुर्गम भागात रस्ते, शिक्षण आणि दूरसंचार सुविधा पोहोचल्या. ₹५५० कोटींचा ३५० खाटांचा रुग्णालय प्रकल्प जगदलपूर येथे सुरू होणार आहे.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ३२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | 9 | 5 | | 7 | | 2 | 3 |
| | | | | 9 | | | | |
| | | 2 | | | | | 4 | 8 |
| 3 | 1 | | 4 | | | | | 9 |
| 5 | | | 6 | 8 | 9 | | | 7 |
| 9 | | | | | 3 | | 5 | 4 |
| 2 | 3 | | | | | 6 | | |
| | | | | 5 | | | | |
| 4 | 9 | | 2 | | 8 | 7 | | 1 |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ३१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 3 | 8 | 7 | 5 | 4 | 1 | 6 | 2 |
| 5 | 2 | 6 | 1 | 8 | 9 | 3 | 7 | 4 |
| 4 | 7 | 1 | 2 | 3 | 6 | 5 | 8 | 9 |
| 1 | 4 | 3 | 6 | 2 | 8 | 9 | 5 | 7 |
| 6 | 9 | 2 | 3 | 7 | 5 | 8 | 4 | 1 |
| 8 | 5 | 7 | 9 | 4 | 1 | 6 | 2 | 3 |
| 2 | 1 | 9 | 8 | 6 | 7 | 4 | 3 | 5 |
| 7 | 6 | 4 | 5 | 9 | 3 | 2 | 1 | 8 |
| 3 | 8 | 5 | 4 | 1 | 2 | 7 | 9 | 6 |

### पंचांग

९ नोव्हेंबर २०२५
रविवार
विक्रम संवत्- २०८२
कार्तिक शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- कार्तिक
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:पंचमी २५:५५:२९+

नक्षत्र:आर्द्रा २०:०४:३०
योग:सिद्ध १५:०१:५३
करण:कौलव १५:०५:४०
करण:तैतिल
२५:५५:२९+
सूर्य:तुला

## उपदेशाचे डोस

### ईश्वरनिष्ठा

एक ईश्वरभक्त होता. तो व त्याचे कुटुंब सन्मार्गी होते परंतु त्याला बायको व मुलांची फार काळजी वाटे. आपली मुले सज्जन आहेत पण बाहेरचे जग तसे नाही. आपल्या मुलांना बदमाश लोक फसवतील या काळजीने तो ग्रासला होता.

एके दिवशी त्याची पत्नी त्याला म्हणाली, 'आपली मुलं इतकी गुणी आहेत व घरातही सर्व सुख असताना आपण नेहमी कसल्या चिंतेत असता?' त्यावर तो म्हणाला, 'आपली मुले गुणी व सज्जन आहेत पण या फसव्या जगात त्यांचा कसा निभाव लागणार, याची मला चिंता वाटते. त्यामुळे मला रात्री झोपही लागत नाही.' पत्नी म्हणाली, 'अहो, तुम्ही ईश्वराची भक्ती करता, शेवटपर्यंत तुम्ही अशी काळजी करत राहणार का?' तो म्हणाला, 'जेव्हा माझा मृत्यू जवळ आला आहे असे वाटेल तेव्हा मी देवाची प्रार्थना करेन की देवा, मी आता चाललो, तू अत्यंत दयाळू आहेस, माझी मुलं नीतिमान आहेत, तू त्यांचे दुष्टांपासून रक्षण कर.' हे ऐकून पत्नी म्हणाली, 'जी प्रार्थना तुम्ही शेवटी करणार, ती प्रार्थना आत्ताच करा, प्रपंचाचा सर्व भार त्या दयाळू ईश्वरावर सोपवून तुम्ही निर्भर राहा.'

कथा उपदेश : प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी झटा.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९५३ - फ्रान्सकडून कंबोडियाला स्वतंत्र मिळाले.
- १९६३ - जपानच्या योकोहामा येथे तीन रेलवे अपघातात १६० हून अधिक जण ठार.

### राष्ट्रीय

- २००६ - उत्तरप्रदेशच्या बहराईच जिल्हयातील डिहवा तथा कडसर बिटौर गावात नशेसाठी स्पिरिटचे सेवन केल्याने एका महिलेसह ११ लोकांचा मृत्यू झाला.
- २००७ - भारतीय कसोटी क्रिकेट संघाच्या कर्णधार पदी कुंबळेच्या नावाची घोषणा करण्यात आली.


### जन्म

- १८४१ - एडवर्ड सातवा, ईंग्लंडचा राजा.
- १८७७ - अल्लामा इकबाल, भारतात जन्मलेले पाकिस्तानचे राष्ट्रकवि.
- १८८२ - ज्यो हार्डस्टाफ, सिनियर, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८८५ - आल्फ्रेड डिपर, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९०४ - एडवर्ड व्हान डेर मर्व, दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू.
- १९११ - रा. शं. वाळिंबे, मराठी साहित्याचे अभ्यासू व थोर समीक्षक.
- १९१८ - स्पिरो ऍग्न्यू, अमेरिकेचा उपराष्ट्राध्यक्ष.
- १९२३ - डोरोथी डॅन्ड्रिज, श्यामवर्णीय अमेरिकन अभिनेत्री.

### निधन

- ०९४९ - कॉन्स्टन्टाईन सातवा, बायझेन्टाईन स्राट.
- १५०४ - फर्डिनांड दुसरा, अरागॉनचा राजा.
- १९६२ - महर्षि धोंडो केशव कर्वे, भारतरत्न किताबाचे मानकरी, स्त्रीशिक्षण व विधवा विवाहासाठी अथक प्रयत्न करणारे.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ३२



**आडवे शब्द**

१. बिघडलेल्या, बदललेल्या मनाचा
३. ज्या राजाच्या नावाने वर्षगणना चालतो तो राजा
५. जिल्ह्याचा न्यायाधीश
९. मुलाची-मुलीची मुलगी
१०. माया, प्रेम, उमाळा
११. अपक्व
१२. पराभव
१३. गणपती
१५. त्रास, तगादा
१६. चांभाराची आर
१७. मार्ग
१८. आयुष्यभर
१९. तात्पर्य, सारांश
२०. समान, योग्य
२२. हाकाटी
२४. त्रास, खेप
२५. पाणी
२६. विलक्षण
२८. एका वर्गात शिकणारे
३१. नीरस, बेचव
३३. घोडशाळा
३४.ओसाड, वस्तीहीन
३५. उजाड, उदास
३७. दात
३८. उंबरठा
४०. मंदीरातील मुख्य सेवेकरी
४२. अटीची भाषा
४३. भाववाढीचा व्यापारांचा मार्ग
४५. कुरघोडी
४६. आयात, आलेला
४८. किनारा
५०. प्रमाणे, सारखे
५१. समाजातील वजन
५२. ओरड, तक्रार, गाऱ्हाणे
५३. पुत्र
५५. लक्ष्मी, शोभा
५७. चिकित्सा
५८. रद्द केलेला
५९. समुद्र
६०. लक्ष्मी
६१. एक आदिवासी जमात
६३. नाही म्हणणे
६५. वर्तमानपत्र (हिंदी)
६७. एक अधिक पाव
६८. उष्ण
६९. हद्द, टप्पा
७०. कट
७२. गवंडी
७३. पूर्णिमा
७६. अक्षरापुढील उभा दंड
७७. दुसऱ्याचा पैसा कसाही खर्च करणारा या अर्थाची म्हण

**उभे शब्द**

१. उशीर न करता
२. दुसऱ्याचे उपकार विसरणारा
३. मनाला टोचणारी गोष्ट, बाणाचे टोक
४. डाळीची वा धान्याची सत्त्वयुक्त आमटी
५. बरा
६. नाश्ता
७. मित्र, स्नेही
८. आण, भाक
१०. बातमीदार
११. दया, करुणा
१४. निराश
१५. मागच्या काळात झालेला
१६. अनुसरणारा, शिष्य
१७. पुन्हा पुन्हा
१९. प्रयत्न
२१. धंदा, उद्योग
२३. रसाने भरलेले
२६. शेळी
२७. चूर्ण
२९. आरोळी, आरडाओरडा
३०. सतत चिंतन
३२. गुणज्ञ
३३. पराक्रमाने जिंकलेला प्रदेश
३४. रिकामी खटपट
३६. धोबी
३९. व्रत
४१. जावई
४४. बातमी देणारा
४६. येणारे
४७. वळकटी
४९. उपहास
५१. अर्धी ओंजळ
५२. पोपटासारखा बोलका पक्षी
५३. संयुक्त विचार
५४. चांदणी
५६. धनी
५८. परिहार, दूर करणे
६२. सुसर
६४. चंद्र
६५. असामान्यता, कौतूक
६६. अभिमान
६६अ. शिव
७०. एक प्रकाशमान कीडा
७१. स्थिर, निश्चल
७२. कबूल, अनुकूल
७३. झाडी, मोहरी
७४. मुस्लिम पंडित अथवा न्यायाधीश
७५. नखरे, हावभाव

**शब्दकोडे क्र. ३१ चे उत्तर**

आडवे उत्तर : २.खबरदारी ५.सवालजवाब ९.दुर्लक्षित १०.माह १२.दंड १४.रवा १६.कस्तुरीमृग १९.जादूगार २०.सनातनी २३.चकमक २४.टग्या २५.सागरतीर २९.जुने ३०.खीर ३१.तरु ३३.कृतज्ञ ३४.टवाळ ३६.अंगना ३९.मोकाट ४१.विटका ४२.सफरचंद ४५.सराईत ४८.अधिक ५०.बोट ५१.करुणा ५२.डाकू ५३.क्रोध ५४.बळकटी ५६.प्रथा ५८.अखिल ५९.दाटी ६०.संतापलेला ६२.दरा ६४.कलकत्ता ६६.खडूस ६८.आरव ६९.बट्टा ७१.जोंक ७२.मलई ७५.कूपमंडूक ७७.कृश ७८.कर्नाटक ७९.रडराऊत

उभे उत्तर : १.दुर्लभ २.खतरनाक ३.रमा ४.दाहक ६.वादंग ७.लड ८.वावदूक ११.कैरी १३.धरणी १५.वात १७.स्तुती १८.मृदंग १९अ.पचका २०.समजूतदार २१.नीटनेटका २२.प्रीती २५.सार २६.रणांगण २७.रस्सा २८.अंत ३०.खीळ ३२.रुक्ष ३५.वाटसरु ३७.कंटक ३८.दासबोध ३९.मोद ४०.बाई ४१.विधिलिखित ४३.फट ४४.चंगळ ४६.राणा प्रताप ४७.तडा ४९.माधवराव पेशवे ५१.कटी ५४.बटीक ५५.कलंक ५७.थाप ६१.लेखक ६१अ.लाडू ६२.दर ६३.मुबलक ६५.लक्ष्य ६७.सम ६८.आई ७०.समंध ७१.जोकर ७३.लढाऊ ७४.भाट ७६.भात

# प्रथमेश आणि पॅडीच्या हॉरर कॉमेडी 'हुक्की'चा फर्स्ट लुक प्रदर्शित

■ अभिनेता वरुण धवनने आपल्या सोशल मीडियावर शेअर केला 'हुक्की'चा फर्स्ट लुक



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

हॉरर-कॉमेडीपटांनी नेहमीच रसिकांना भुरळ घातली आहे. चार मित्रांची गोष्ट सांगणारा 'हुक्की' हा आगामी मराठी चित्रपटही क्षणाक्षणाला प्रेक्षकांची उत्कंठा वाढविणारा आहे. 'हुक्की'च्या पहिल्या पोस्टरनंतर या चित्रपटाचा फर्स्ट लुक नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. दमदार कलाकारांची फौज आणि प्रवाहापेक्षा वेगळा विषय असल्याने 'हुक्की'च्या फर्स्ट लुकने प्रदर्शित झाल्यापासूनच रसिकांचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर 'हुक्की'च्या फर्स्ट लुकची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. हिंदी सिनेसृष्टीतील आघाडीचा अभिनेता वरुण धवनने 'हुक्की'चा फर्स्ट लुक आपल्या सोशल मीडियावर शेअर केला आहे. निर्माते नितीन रोकडे, सुनंदा काळुसकर, विनायक पाष्टे, श्वेता संजय ठाकरे तसेच सहनिर्माते सुधीर खोत आणि रईस खान यांनी मॅजिक स्वान स्टुडिओज आणि एनएमआर मुव्हीज या बॅनरखाली 'हुक्की' चित्रपटाची निर्मिती केली आहे. कथालेखनासोबतच 'हुक्की'चे दिग्दर्शन नितीन रोकडे यांनी केले आहे. 'हुक्की'चा फर्स्ट लुक खऱ्या अर्थाने रसिकांचा उत्साह वाढविणारा आहे. कावळ्याचा लालभडक डोळा उघडतो आणि फर्स्ट लुकची सुरुवात होते. त्यानंतर समुद्रकिनारी कोळी बांधव होडी ओढत असल्याचे दृश्य पाहायला मिळते. या दृश्यामागोमाग तीन तरुण आणि एक तरुणी यांची चौकडी चालत येत असल्याचे दिसते. त्यांना फोर लूझर्स असे संबोधले गेले आहे. त्यानंतर एक भयावह रात्र सुरू होते. या रात्री चौघेही काहीशा विचित्र परिस्थितीत अडकतात. फर्स्ट लुक पाहिल्यावर 'हुक्की' या हॉरर कॉमेडीपटात प्रवाहापेक्षा वेगळे कथानक पाहायला मिळणार असल्याची जाणीव होते. महाराष्ट्राचा लाडका अभिनेता प्रथमेश परब आणि विनोदाचा बादशाह पंढरीनाथ कांबळे उर्फ पॅडी या चित्रपटात एकत्र झळकणार आहेत.

फर्स्ट लुक बाबत नितीन रोकडे म्हणाले की, 'हुक्की'च्या कथानकाचा बाज लक्षात घेऊन फर्स्ट लुक तयार करण्यात आला आहे. हा फर्स्ट लुक अत्यंत कमी वेळात आपले काम चोख बजावणारा आहे.



जुन्नर तालुका : सावरगाव मध्ये ता:-जुन्नर काकडा समाप्ती व सामुदायिक तुलसी विवाह सोहळ्या मोठ्या उत्साहात संपन्न झाला गेल्या महिनाभर म्हणजे कोजागिरी पौर्णिमा ते कार्तिक पौर्णिमा पहाटे हरिनामाच्या गजरामध्ये काकडा आरती संपन्न होत होती त्या काकडा आरतीची समाप्ती आणि सामुदायिक तुलसी विवाह सोहळा नवश्या मारुती चौक सावरगाव येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यामध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ,उत्कर्ष मंडळ सावरगाव,श्रीराम देवस्थान ट्रस्ट, विठ्ठल रुक्मिणी देवस्थान ट्रस्ट यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याप्रसंगी ज्येष्ठ,श्रेष्ठ,तरुण, महिला आणि बालकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.या संपूर्ण महिनाभराच्या काकडा कालावधीमध्ये ज्या भाविकांनी योगदान केल्या बद्दल त्यांचे मंडळाच्या वतीने योग्य तो मानसन्मान करून सर्वांचे मनापासून आभार मानले.

## थोडक्यात बातम्या...




## संदेश डफळ शालेय विभागीय स्पर्धेमध्ये रौप्य पदकाचा मानकरी

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचा खेळाडू संदेश डफळ यांनी पुणे बालवाडी येथे दिनांक 04 व 05 नोव्हेंबर 2025 रोजी पार पडलेल्या शालेय विभागस्तरीय ज्युदो स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम फेरी मध्ये पुणे शहर व द्वितीय फेरी मध्ये पिंपरी चिंचवड मधील खेळाडूंना हरवत फायनल मध्ये प्रवेश केला. द्वितीय क्रमांक मिळवत रौप्य पदकाचा मानकरी ठरला. संदेशचे महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी आ. बबनराव पाचपुते, महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य मा. बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी आ. राहुल जगताप, मा. महावीर पाठवा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, डॉ.सुदाम भुजबळ, डॉ.नितीन थोरात, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, जिमखाना प्रमुख प्रा.रमेश थोरात व प्रा. श्रीकांत थोरात, विभाग प्रमुख प्रा रमेश भुजबळ, प्रा उषा बोरुडे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, श्रीगोंदा तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार सर, सर्व क्रीडा समिती व सर्व क्रीडाशिक्षक यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना क्रीडा शिक्षक संजय डफळ, क्रीडा संचालिका कल्पना बागुल कोच डॉ.संजय धोपावकर सर, वस्ताद सोमा राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

## मंगरूळ व आळे येथे घरफोडी करणारे सराईत जेरबंद



आळेफाटा (स. गांवकरी) : आळेफाटा, नारायणगाव व मंचर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करणारे दोन सराईत चोरटे जेरबंद करण्यात आळेफाटा पोलिस व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागास यश आले. त्याच्याकडून सोन्या चांदीसह रोख रक्कम असा ८ लाख ५० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. मोहन भिकाजी भोसले (वय २०) व किशोर हापूस भोसले (वय २०, दोघे रा. कासाटी, आष्टी, जि. बीड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार मंगरूळ येथील विक्रम महादू डेरे यांच्या घराचे कुलूप तोडून ९ ऑक्टोबर रोजी दिवसा चोरट्यांनी साडेतीन तोळे सोन्याचे दागिने चोरून नेले होते. याबाबत आळेफाटा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली होती. आळेफाटा पोलिस व स्थानिक गुन्हे अन्वेषण पथक यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे व गोपनीय बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे मोहन व किशोर यांना आळेफाटा येथे ताब्यात घेतले. या दोघांनी मंगरूळ, चाळकवाडी तसेच आळे येथील घरातील चांदीचे मुकुट तसेच रोख पन्नास हजार रूपये, नारायणगाव व मंचर पोलिस ठाण्यांचे हद्दीत घरफोडी करत साडेतीन तोळे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची कबुली दिली. पोलिसांनी चोरीतील एकूण ७ तोळे सोन्याचे दागिने, १८ तोळ्याचा चांदीचा मुकुट, रोख पन्नास हजार, दुचाकी असा साडे आठ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. ही कामगिरी उपविभाग पोलिस अधिकारी धनंजय पाटील, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर, आळेफाटा ठाण्याचे पोलिस निरीक्षक विश्वास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे विक्रम तापकीर, दीपक साबळे, हेमंत विरोळे, संदीप वारे, अक्षय नवले, नीलेश सुपेकर व आळेफाटा ठाण्याचे सतीश टाव्हरे, अमित मालुंजे, विनोद गायकवाड, पंकज पारखे, नवीन आरगडे, गणेश जगताप, ओंकार खुणे यांनी केली.



## योजनांची शिदोरी हे सर्वांच्या घरोघरी पोहचवा : दादाजी भुसे

नाशिक (स. गांवकरी) : शिवसेना आपल्या दारी घेऊन आली योजनांची शिदोरी संपूर्ण महाराष्ट्र हा कार्यक्रम राबवला जाणार आहे. सर्वसामान्यांच्या घराघरापर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्याचे काम सर्व शिवसैनिकांना करायचे असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले प्रभाग क्र १४ मधील संत कबीर नगर, मातंग वाडा, वाल्मिकी नगर येथील ड्रेनेज व रस्ते काँक्रिटीकरण कामासाठी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या विशेष निधीतून दोन कोटी निधी मंजूर करून या कामाचे उद्घाटन शनिवारी (दि ८) संत कबीर नगर येथे करण्यात आले.

# कोतुळ येथील व्रणोपचारक पशुवैद्य कै. सोमनाथ सावळेराम कडाळे यांचे निधन!

### समाजसेवेतून आणि प्रामाणिक कार्यातून घडविले आदर्श जीवन!

**अकोले तालुका : (समर्थ गांवकरी)**

कोतुळ येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात व्रणोपचारक (श्रेणी-1) म्हणून दीर्घकाळ प्रामाणिक सेवा बजावणारे कै. सोमनाथ सावळेराम कडाळे (वय 65) यांचे दिनांक 31 ऑक्टोबर 2025, शुक्रवार रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने कोतुळ व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

कै. कडाळे यांचा जन्म 1 जून 1960 रोजी लहित खुर्द येथे झाला. त्यांचे बालपण लहित बु. येथे गेले. वडील सावळेराम सोमा कडाळे हे श्रमिकवृत्तीचे व प्रामाणिक व्यक्तिमत्त्व असलेले तर आई कासाबाई सावळेराम कडाळे गृहिणी होत्या. प्राथमिक शिक्षण लहित खुर्द येथे आणि माध्यमिक शिक्षण अहिल्यानगर येथे पूर्ण केले.

सन 1979 मध्ये समशेरपूर येथून पशुवैद्यकीय सेवेत रुजू होऊन त्यांनी चार वर्षे तेथे सेवा दिली. त्यानंतर कोतुळ येथे तब्बल 35 वर्षे, कोहणे येथे 1 वर्ष, तसेच लिंगदेव येथे 2 वर्षे सेवा करताना त्यांनी पशुपालकांच्या हितासाठी आयुष्यभर कार्य केले. प्राण्यांच्या उपचारात त्यांना उत्तम अनुभव होता. गावोगावी व्रणोपचारक म्हणून त्यांची ओळख अत्यंत विश्वासार्ह, संवेदनशील व समर्पित सेवक अशी होती. एकूण 40 वर्षांचा दीर्घ सेवा कालावधी त्यांनी पूर्ण केला.

सन 1980 मध्ये त्यांचा विवाह सौ. विमल सोमनाथ कडाळे (शिक्षण : इ.5 वी) यांच्याशी झाला. परिवारप्रेमी व कष्टाळू स्वभावामुळे त्यांनी आपल्या मुलींचे शिक्षण व संसार यशस्वीरीत्या घडवले. त्यांच्या परिवारात पत्नी सौ. विमल सोमनाथ कडाळे, त्यांच्या मुली



1. मंगल सोमनाथ कडाळे (M.A., क्लर्क – प्राथमिक आरोग्य केंद्र, धामणगाव पाट, कोतुळ),
2. संगिता राजू मेंगाळ (SSC),
3. अर्चना गिरीश केदारी (B.Sc. Horticulture),
4. वनिता भरत पारधी (M.Com, B.Ed),
5. प्रियंका सोमनाथ कडाळे (M. Pharm, असिस्टंट प्रोफेसर – बेल्हे फार्मसी कॉलेज)

तर जावई –

1. राजू ढवळा मेंगाळ (शिक्षक, जि.प. प्रा. शाळा, कोपरगाव),
2. गिरीश सुरेश केदारी (इंजिनियर, मुंबई),
3. भरत पोपट पारधी (M.E. Civil Engineer, अकोले) आहेत.

तसेच भावंडांमध्ये भाऊ – कोंडीभाऊ सावळेराम कडाळे व कै. देवराम सावळेराम कडाळे,

बहिणी – तान्हाबाई हरिभाऊ डोके, सोनाबाई शंकर मधे व गीताबाई गेणू मेंगाळ. कै. कडाळे हे कै. रंगुबाई भावका पारधी यांचे जावई होत. त्यांनी आपल्या सेवेतील काळात गावागावातील शेतकऱ्यांना, पशुपालकांना नेहमी मार्गदर्शन केले. उपचारासोबत प्रेमळ संवाद व मायेचा स्पर्श हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या निधनाने कोतुळसह लहित परिसरातील समाज, शेतकरी व सहकारी यांच्यात शोककळा पसरली आहे. शांत, संयमी, मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी सर्वांच्या मनात स्थान मिळवले. त्यांच्या स्मृती कायमच समाजात आदराने जपल्या जातील.

"प्रामाणिक सेवक, प्रेमळ व्यक्तिमत्त्व – कै. सोमनाथ सावळेराम कडाळे यांच्या स्मृतीस नमन."

## कोतूळ येथील डॉ. सोमनाथ कडाळे यांचे निधन

**कोतूळ : (समर्थ गांवकरी)**

कोतूळ (ता. अकोले): कोतुळ गावातील आदरणीय व समाजसेवक कै. डॉ. सोमनाथ सावळेराम कडाळे यांचे शुक्रवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. डॉ. कडाळे यांनी आयुष्यभर परिश्रम, माणूसकी आणि सेवाभाव यांचा आदर्श ठेवत समाजात आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यांनी अनेकांना मदतीचा हात दिला, लोकांशी स्नेहाचे नाते जपले आणि सर्वांच्या मनात आपलेपण जिंकले. त्यांचा दशक्रिया विधी रविवार, दिनांक ०९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता कोतुळ येथील कोतुळेश्वर मंदिर मुळातिरी येथे पार पडणार आहे. या वेळी ह.भ.प. आजित महाराज दिघे (सर) यांची प्रवचन सेवा होणार आहे. याप्रसंगी सर्व नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार, ग्रामस्थ उपस्थित राहणार आहेत.



शोकाकुल : समस्त कडाळे, मेंगाळ, केदारी, पारधी परिवार व आप्तेष्ट, ग्रामस्थ लहित खुर्द, कोतूळ त्यांच्या आत्म्यास ईश्वरचरणी शांती लाभो, हीच विनम्र प्रार्थना.

## शेडगावच्या उपसरपंचपदी रुपाली अमोल झेंडे यांची बिनविरोध निवड

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या शेडगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी रुपाली अमोल झेंडे यांची निवड करण्यात आली. मावळते उपसरपंच जयश्री भुजबळ यांनी आवर्तन पद्धतीनुसार राजीनामा दिल्याने त्यांच्या रिक्त जागी उपसरपंच पदाच्या निवडीसाठी शुक्रवार (दि.७) रोजी दुपारी २ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच मंगल शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली सदस्यांची बैठक बोलविण्यात आली. यावेळी उपसरपंच पदासाठी रुपाली अमोल झेंडे यांचा निर्धारित वेळेत एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने रुपाली झेंडे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. त्यांना सूचक म्हणून विजय रसाळ यांनी स्वाक्षरी केली. अनुमोदन शाहूराजे भोपळे यांनी सही केली यावेळी ग्रामपंचायत सरपंच मंगल शेंडे ग्रामपंचायत सदस्य संध्या शेंडे, सोनाली भदे, पार्वती गवळी, विलास रणसिंग, जयश्री भुजबळ, शाहूराजे भोपळे, विजय रसाळ यांच्यासह माजी सरपंच विजय शेंडे, भीमराव बेलेकर, धनराज भोपळे, लिंबाजी रसाळ, महेंद्र रणसिंग, प्रसाद भदे, शिवाजी भदे उपस्थित होते. नवनिर्वाचित उपसरपंच रुपाली झेंडे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. फटाक्यांच्या आतषबाजीत रुपाली झेंडे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.



यावेळी महाराष्ट्र राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहटा यांनी उपसरपंच रुपाली झेंडे यांचा सत्कार करत पुढील वातचलीसाठो शुभेच्छा दिल्या आहेत. रमेश गिरमकर सुनील गिरमकर महेश गिरमकर हरदास शिर्के गणेश झिटे सुशील कुमार शिंदे यांच्यासह तालुक्यातील विविध स्तरातील अधिकारी पदाधिकारी व शेडगाव ग्रामस्थ यांच्याकडून उपसरपंच रुपाली झेंडे यांचेवर अभिनंदन वर्षाव होताना दिसत करण्यात आला. उपसरपंच पदाचा मान श्रीगोंदा तालुक्यात धडाडीचे पत्रकार म्हणून ओळख असलेले अमोल झेंडे यांच्या पत्नी रुपाली झेंडे यांना शेडगावच्या ग्रामपंचायत मध्ये उपसरपंच पदाचा मान मिळाल्याने पत्रकारांसह सगळीकडून कौतुकाचा वर्षाव होतात ते दिसत असतो होता.

## श्रीगोंदा नगरपरिषदेची निवडणूक २ डिसेंबर रोजी ३ डिसेंबरला मतमोजणी



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा नगरपरिषदेच्या निवडणुकीचा बिगुल अखेर वाजला आहे. लोकशाहीचा हा उत्सव २ डिसेंबर रोजी पार पडणार असून, ३ डिसेंबरला निकाल लागणार आहे. एकूण ३१,१३४ लोकसंख्या ३२ मतदान केंद्रे तयार करण्यात आली असून, मोठ्या प्रमाणात कर्मचारी निवडणुकीच्या कामात सहभागी होणार आहेत. श्रीगोंदा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा करण्यात आली असून मतदान २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पार पडणार आहे. मतमोजणी ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी दिली.

निवडणुकीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे : नामांकन अर्ज दाखल: १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर छाननी: १८ नोव्हेंबर अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख: १९ ते २१ नोव्हेंबर निवडणूक चिन्हांचे वाटप: २६ नोव्हेंबर मतदान: २ डिसेंबर (सकाळी ७.३० ते सायं. ५.३०) मतमोजणी: ३ डिसेंबर (सकाळी १० वाजता) श्रीगोंदा शहरातील एकूण लोकसंख्या ३१,१३४ असून, मतदानासाठी ३२ मतदान केंद्रे ठेवण्यात आली आहेत. या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत.

## बँकांची आढावा बैठक संपन्न

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे जिल्ह्यातील सर्व बँकांची आढावा बैठक दि.०७ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात पार पडली. सदर बैठकीस भारतीय रिझर्व्ह बँक, नाबार्ड, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक अभिषेक पवार, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक सोनाली देवरे, RSETI संचालक, ठाणे, सर्व बँकांचे जिल्हा समन्वयक, राज्य शासनाच्या विविध महामंडळांचे प्रतिनिधी तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी ठाणे जिल्ह्यातील सर्व बँकांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. प्रामुख्याने वार्षिक कर्ज योजना (ACP) 2025-26, शासकीय प्रायोजित योजना (PMEGP, CMEGP, PM Vishwakarma, PMFME, Stand-Up India, Mudra), तसेच आर्थिक समावेशन आणि सामाजिक सुरक्षा योजना (PMJJBY, PMSBY, APY) या विषयांवर चर्चा केंद्रित होती.

### डॉ. विश्वासराव आरोटे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन : "शाळा हेच खरे ज्ञानाचे मंदिर"

# उंचखडक येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक सेमी इंग्रजी शाळा, उंचखडक येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा प्रेरणादायी कार्यक्रम पार पडला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि शालेय साहित्याच्या माध्यमातून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस हातभार लागावा, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उंचखडक ग्रामपंचायतीचे




कार्यसम्राट व उपसरपंच महिपाल देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी पोलिस पाटील बाळासाहेब देशमुख, विजय देशमुख, मुख्याध्यापिका घुले मॅडम, क्षीरसागर मॅडम, खोकले सर, अंगणवाडी सेविका संगीता गावंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय दप्तर, पेन, वह्या आदी साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल आत्मविश्वास आणि प्रेरणा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधत अत्यंत प्रेरणादायी विचार मांडले. त्यांनी सांगितले – "आपण आज जे काही विद्यार्थ्यांना देत आहोत, ते पुण्य आपण या पावन भूमीतून देत आहोत. प्रत्येक विद्यार्थ्याने ठरवले पाहिजे की, ज्या शाळेत आपण शिक्षण घेतले त्या शाळेच्या विकासासाठी आपण काहीतरी करायचे. प्रत्येकाने आपल्या शाळेसाठी मदतीचा हात दिला, तर नक्कीच ग्रामीण भागातील मराठी शाळादेखील शहरी शाळांच्या तोडीस तोड प्रगती करतील."

डॉ. आरोटे यांनी पुढे सांगितले की, "शाळा हेच खरे ज्ञानाचे मंदिर आहे.

येथे सरस्वती व लक्ष्मी दोन्ही नांदतात. त्यामुळे गावातील मंदिरांना देणगी देण्यापेक्षा शाळेतील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी निधी व देणगी देऊन खरे सामाजिक कार्य करावे. शिक्षणात गुंतवणूक केली, तर ती भविष्यात समाजाच्या प्रगतीत परत येते."

या प्रसंगी उपसरपंच बबनराव देशमुख यांच्या शुभहस्ते डॉ. विश्वासराव आरोटे यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन खोकले सर यांनी तर आभार प्रदर्शन क्षीरसागर मॅडम यांनी केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनात शाळेतील सर्व शिक्षक, अंगणवाडी सेविका, पालक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शाळेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

## थोडक्यात बातम्या...




### देगलूर येथील अनेक कार्यकर्ते यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये पक्षप्रवेश

देगलूर (स. गांवकरी) : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा लोहा कंधार विधान सभेचे आ . प्रतापराव पाटील चिखलीकर, यांच्या उपस्थितीत कंधार तालुका येथील संपर्क कार्यालयात देगलूर तालुक्यातील देगलूर येथिल माजी नगरसेवक दिगंबर कडलवार ,भा.ज.पा. शहर उपाध्यक्ष बालाजी मैलागीरे,उ.बा.ठा.शिवसेना शहर प्रमुख रवी उल्लेवार, सुभाष अक्यमवार, नागनाथ आपस्लवार, सुधाकर उल्लेवार, श्रिनिवास उल्लेवार, राजु पांडलवार, शैलेश पांडलवार, गंगाधर कडलवार, सचिन कडलवार, किरण कडलवार, रितेश यरगलवार, लक्ष्मण आरगुलवार, बालन्ना मैलागिरे यांच्यासह अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये पक्ष प्रवेश केला. यावेळी गंगाधर बत्तुलवार, दिगंबर कौरवार, बबलु टेकाळे, ओमकार उल्लेवार, पिटू सुरकुटलावार आदिची उपस्थिती होती.

### कुकडी डावा कालवा दुरुस्ती कामाचे भूमिपूजन : आमदार काशिनाथ दाते सर



पारनेर (स. गांवकरी) : सोमवार दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री ( गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते पारनेर तालुक्यातील निघोज येथे सकाळी ११ : ०० वाजता महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत कुकडी डावा कालवा १ ते ६० कि.मी. ची विशेष दुरुस्ती करण्याच्या (कामाची किंमत रुपये ८२.८३ कोटी) कामाचा भुमिपूजन सोहळा पार पडणार असल्याची माहिती पारनेर-नगर विधानसभा मतदार संघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली. या सोहळ्याला आमदार काशिनाथ दाते सरांसह माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, जुन्नर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शरददादा सोनवणे, श्रीगोंद्याचे आमदार विक्रम पाचपूते उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले असून या भुमिपूजन समारंभानंतर त्याच ठिकाणी महायुतीचा भव्य मेळावा आयोजित करण्यात येणार आहे.

# त्रिपुरारी पौर्णिमा दीपोत्सवाने अगस्ति आश्रम परिश्रम उजाळला

अकोले : (समर्थ गांवकरी)

श्री अगस्ती देवस्थान ट्रस्ट अकोले आयोजित त्रिपुरारी पौर्णिमा दीपोत्सव उत्साहात संपन्न झाला.

सालाबाद प्रमाणे याही वर्षी अगस्ति आश्रमावर त्रिपुरारी पौर्णिमेचा दीपोत्सव आयोजित करण्यात आला होता.या दीपोत्सवामुळे सर्व अगस्ति आश्रम परीसर उजाळून निघाला होता. या दीपोत्सव मध्ये शेकडो नागरिक सहभागी होऊन या नयनरम्य दीपोत्सवाचा आनंद लुटला.यावेळी अनेकांना सेल्फी काढण्याचा मोह टाळता आला नाही.



तसेच श्री अगस्ती ऋषी रचित आदित्य हृदय स्तोत्र या पुस्तिकेचे द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन मालपाणी उद्योग समूहाचे संचालक डॉक्टर संजय मालपाणी यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रतिवर्षी अगस्ति आश्रमावर त्रिपुरारी पौर्णिमेच्या निमित्ताने हजारो पणत्यांच्या प्रकाशात आश्रम उजळवण्यात येतो यामध्ये अनेक समाजसेवी संघटना चा समावेश असतो त्रिपुरारी पौर्णिमा उत्सव हा देव दिवाळी म्हणून साजरा केला जातो. आश्रमाची ही परंपरा गेल्या अनेक वर्षांची आहे .

याही वर्षी या उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अगस्ति देवस्थान ट्रस्ट व अगस्ति ऋषी गुरुकुल च्या विशेष सहभागाने हा उत्सव आनंददायक झाला. शेकडो भाविकांची उपस्थिती उत्सवाचा उत्साह वाढवणारी होती . प्रतिवर्षी या उत्सवाला भाविकांचा प्रतिसाद वाढत आहे.

यावर्षी आदित्य हृदय स्तोत्र या ग्रंथाची द्वितीय आवृत्तीची छपाई अकोल्यातील व्यापार व्यवसाय क्षेत्रातील व धार्मिक अध्यात्मिक क्षेत्रात योगदान असणाऱ्या चोथवे परिवाराच्या माध्यमातून दत्तात्रय शेठ चोधवे यांच्या प्रेरणेने संगमनेर येथील प्रसिद्ध युवा उद्योजक संदीप चोथवे यांनी दहा हजार आवृत्तींची छपाई केली. त्याचे प्रकाशन डॉ संजय मालपाणी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी त्यांनी आश्रमाचा होत असलेला विकास पाहून आनंद वाटला असे मत व्यक्त केले. त्यासाठी ॲड. के.डी.धुमाळ व सर्व विश्वस्त मंडळाचे विशेष कौतुक डॉ. संजय मालपाणी यांनी केले. येणारा कुंभमेळा डोळ्यासमोर ठेवून अगस्ति महाराजांच्या मंदिराचे व कार्याचे वेगवेगळ्या स्तरावर प्रचार प्रसार करण्यात यावा व कुंभमेळ्याच्या निमित्ताने देशातील येणारा साधू समाज व भाविक यांची अगस्ती आश्रमावर दर्शनाच्या निमित्ताने गर्दी व्हावी यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना डॉ.संजय मालपाणी यांनी दिल्या. या प्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक पंढरीनाथ चावडे यांनी दरवर्षी प्रमाणे आपल्या पत्नी स्वर्गीय सखुबाई चावडे यांच्या स्मरणार्थ शालेय गरीब विद्यार्थ्यांना स्कुल बॅगचे वाटप केले. व अन्नदान केले. त्यांच्या या कार्याचे अगस्ति देवस्थानचे अध्यक्ष के डी धुमाळ यांनी विशेष कौतुक केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अगस्ती देवस्थानचे विश्वस्त गुलाबराव शेवाळे, किसन शेठ लहामगे, रामनिवास राठी, सतीशशेठ बुब,ह.भ.प.दिपक महाराज देशमुख, राजेंद्र महाराज नवले,गणेश महाराज वाकचौरे ,मच्छिंद्र भरीतकर,प्रा. गणपत नवले ,रविंद्र चोथवे ,उपप्राचार्य दीपक जोंधळे आदी उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देवस्थानचे व्यवस्थापक रामनाथ मुतडक यांनी विशेष परिश्रम घेतले .स्वागत व सूत्रसंचालन ह भ प दीपक महाराज देशमुख यांनी केले.

# पोलिस निरीक्षक जगदीश भांबळ यांची नियुक्तीबद्दल सत्कार

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

तोफखाना पोलिस स्टेशन येथे पोलिस निरीक्षक जगदीश भांबळ यांची नुकतीच नियुक्ती झाल्याबद्दल आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राष्ट्रवादी ओबीसी विभाग अध्यक्ष अमित खामकर, विशाल पेंटस् चे संचालक हरीश भागवाणी , अहिल्यानगर केमिस्ट असोसिएशनचे खजिनदार मनोज खेडकर, राष्ट्रवादी महिला उपाध्यक्षा सुनीता वाल्हेकर, राष्ट्रवादी महिला सचिव अंबिका भिसे,उद्योजक जय रंगलानी आदी मान्यवर उपस्थित होते. अमित खामकर म्हणाले "आज आपल्या परिसरातील पोलिस दलात नवीन अधिकारी म्हणून पोलिस निरीक्षक जगदीश भांबळ यांची नियुक्ती झाल्याचा आम्हाला अभिमान वाटतो. समाजातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस दलाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. प्रामाणिकपणे आणि निःस्वार्थपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास वाढतो. नवीन नियुक्तीमुळे तोफखाना पोलिस स्टेशनमध्ये नागरिक सुरक्षेच्या कार्यात नवी ऊर्जा व दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना जगदीश भांबळ म्हणाले नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी मी प्रामाणिकपणे कार्य करणार आहे. जनतेच्या सहकार्यानेच पोलिस दल आपले कार्य प्रभावीपणे पार पाडू शकते.



# रामकाल पथसह विविध कामांची पाहणी

नाशिक : (समर्थ गांवकरी)

राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांनी शनिवारी रामकुंडसह विविध स्थळांना भेट देत पाहणी केली. तसेच याठिकाणी सुरू असलेल्या विविध विकास कामांना गती देण्याचे निर्देश दिले. नाशिक त्र्यंबकेश्वर येथे 2027 मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या सुरू असलेल्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्य सचिव राजेशकुमार आज नाशिक येथे आले होते. दुपारी विभागीय आयुक्त कार्यालयात आढावा बैठक घेतल्यानंतर त्यांनी द्वारका परिसर, अमृत स्नान पर्वणी मार्ग, रामकुंड, काळाराम मंदिर, सीता गुंफा, स्मार्ट सिटी नियंत्रण कक्ष आदी ठिकाणी भेटी देऊन पाहणी केली.



# सेवानिवृत्त मुख्याध्यापक गोपीनाथ हाडवळे यांचा भव्य सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

**अकोले तालुक्यातील मान्यवर, आमदार आणि सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती!**

**लेखन : डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून !**






अकोले : (समर्थ गांवकरी)

आयुष्यभर आपण विनाअनुदानित तत्वावर नोकरी केली तरी आपल्या गावातच एक शिक्षणाचे दार उघडून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील करण्यासाठी लिंगेश्वर आदर्श विद्यालय येथील शिक्षकांनी जे योगदान दिले ते योगदान संपूर्ण हिंदुस्तानाला लाजवेल पगारातील चार पगार विद्यार्थ्यांसाठी खर्च करत असताना हे आपले मुले असून या शिक्षकांचा आदर्श नक्कीच जगाला आदर्श वाटेल असे मत डॉक्टर विश्वास आरोटे यांनी व्यक्त केले

अकोले तालुक्यातील मुळा परिसरातील शिक्षणाचा एक उज्वल अध्याय व नवीन पर्व. लिंगेश्वर आदर्श विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक गोपीनाथ निवृत्ती हाडवळे यांच्या दीर्घ, कार्यमय आणि प्रेरणादायी शैक्षणिक सेवेला मानवंदना देण्यासाठी सेवापूर्ती गौरव सोहळा शनिवारी, दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता विद्यालयाच्या प्रांगणात भव्यदिव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला होता

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महिला गृह उद्योग लिज्जत पापडचे कार्यकारी संचालक सुरेशराव कोते (नाना) अध्यक्षस्थानी होते

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून, अकोले विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार डॉ. किरणजी लहामटे, यांनी या विद्यालयासाठी एक खोडी बांधून देण्याचे अभिवचन दिले शासनाकडून मदत नाही झाली तर मी स्वतः मदत करील अशी ग्वाही दिली यावेळी जिल्हा परिषदेच्या भावी अध्यक्ष पुष्पाताई लहाने व डॉक्टर विश्वास आरोटे यांनी गोपीनाथ हाडवळे यांचा सहपत्नी पुष्पगुच्छ घड्याळ देऊन सत्कार करण्यात आला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते हरिभाऊ फापाळे यांनी या विद्यालयासाठी व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने प्रथम पासूनच मदत केली असल्यास देखील उल्लेख गोपीनाथ हाडोळे सर यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला

हे या सोहळ्याला उपस्थित राहून आपल्या भाषणातून हाडवळे सरांच्या सेवेला आणि त्यांच्या योगदानाला मानवंदना अर्पण केली

**सामाजिक कार्यकर्त्या पुष्पाताई लहामटे :** मुंबई महानगरपालिकेचे गार्डन सुपरिटेंडंट विजय हिरे, आयडीबीआय बँकेच्या व्यवस्थापिका प्रेमलताबाई हिरे, , कै. रामदास नायक सर्व सेवा संघाचे अध्यक्ष भास्कर फापाळे, संचालक कारभारी जाधव सर, , सामाजिक कार्यकर्त्या सुनीताताई मुंदडा, , सेवानिवृत्त मुख्याध्यापक विलास महाले, विस्ताराधिकारी संभाजी झावरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) तालुकाध्यक्ष शरद चौधरी, मैत्रेय ट्रॅव्हल्सचे संचालक भाऊसाहेब घोमल, संगमनेरचे उद्योजक नारायण इटप, ऋषिकेश हाडवळे,, राष्ट्रवादी कॉंग्रेस शहराध्यक्ष विनायक धुमाळ, मुळा ग्रामीण शिक्षण संस्थेचे सचिव दगडू हसे अण्णासाहेब सावंत, भागवत घोमल, , ग्रामपंचायत सरपंच अमित घोमल, लहीत ग्रामपंचायत सरपंच मंगल चौधरी, सावरचोळ ग्रामपंचायत सरपंच अनिता कानवडे, लिंगेश्वर पतसंस्थेचे अध्यक्ष प्रभाकर फापाळे, वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सचिन महाराज चौधरी, मुख्याध्यापक संघाचे तालुकाध्यक्ष सुनील धुमाळ, तसेच प्रमुख शिक्षक रावसाहेब वालेकर, विक्रम गोरडे, भिमाशंकर हांडे, , किरण भागवत, श्याम मालुंजकर, अनिल मंडलिक, संजय उकिरडे

तसेच लिंगेश्वर देवस्थानचे विश्वस्त रामकृष्ण कानवडे, मंगेश पापाळे, मुख्याध्यापक संघटनेचे सचिव तु.रा. कानवडे, रामदास शिंगोटे, पोपट कदम, अनिल कातोरे, भाऊसाहेब गोडसे, किसन काळे, राजेंद्र गवंदे, पांडुरंग लांडगे, विनायक फटांगरे, भाऊ पाटील कानवडे, गणेश पवार, सदाशिव कानवडे, मंगल पवार, कामगार पोलीस पाटील ज्ञानेश्वर भांगरे, श्रीमती रूपाली कुलकर्णी, माधव चौधरी, अण्णासाहेब ढगे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक किशोर धुमाळ, प्रगतशील शेतकरी जालिंदर बोराडे, रामनाथ चौधरी, कैलास पावशे, सोमनाथ खराटे, रणजीत हासे, सतीश तोरकडी, पोपट हाडवळे, शरद कानवडे, राजेंद्र आढाव, वसंत हाडवळे, नारायण चौधरी, , भास्कर कानवडे, सुधीर कानवडे, लहानु चौधरी, शांताराम चौधरी, सचिन निर्मळ, सौरभ पवार, भाऊसाहेब हाडवळे प्रल्हाद देशमुख, डॉ. तुषार गावडे, कैलास फापाळे यांस शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

या सोहळ्यात हाडवळे सरांच्या शैक्षणिक योगदानाचा आढावा, विद्यार्थ्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या आठवणी, तसेच त्यांच्या सेवेचा गौरव करणारी भाषणे होणार झाली. लिंगेश्वर विद्यालयातील संचालक मंडळ, शिक्षकवर्ग व कर्मचारी यांनी या कार्यक्रमाची जय्यत तयारी केली होती परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले

या गौरव सोहळ्याचे सुत्रसंचालन विद्यालयातील शिक्षकांकडून करण्यात आले कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे देखील आयोजन करण्यात आले होते.

लिंगेश्वर विद्यालयाच्या संचालक मंडळाने, सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाने तालुक्यातील शिक्षणप्रेमी नागरिक, पालक व माजी विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संस्मरणीय सोहळ्याचे साक्षीदार झाले

"लिंगेश्वर विद्यालयाचा 'पॅटर्न' ठरला प्रेरणादायी – सेवापूर्तीच्या क्षणीही विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी तत्पर असलेले मुख्याध्यापक गोपीनाथ हाडवळे" – शिक्षणासाठी आयुष्य वेचले, पगाराचा हिस्सा विद्यार्थ्यांच्या हितासाठी अर्पण !

अकोले तालुक्यातील मुळा परिसरातील लिंगेश्वर आदर्श विद्यालय हे आज शिक्षण, संस्कार आणि सेवाभाव यांचे प्रतिक बनले आहे. या विद्यालयाला घडविणारे, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सर्वस्व अर्पण करणारे सेवानिवृत्त मुख्याध्यापक गोपीनाथ निवृत्ती हाडवळे हे केवळ एक शिक्षक नसून शिक्षणाची नवी दिशा दाखवणारे व्यक्तिमत्त्व आहेत.

शिक्षण क्षेत्रातील त्यांची सुरुवात ही एका विनाअनुदान शिक्षण संस्थेत झाली. अल्पसुविधा, मर्यादित साधनसामग्री असूनही त्यांनी 'विद्यार्थी प्रथम' हे तत्त्व स्वीकारले. परंतु बाहेरच्या संस्थेत कार्य करताना त्यांना समाधान मिळाले नाही. आपल्या गावातील आणि परिसरातील मुलांच्या प्रगतीसाठी काहीतरी वेगळं करावं, या भावनेतून त्यांनी लिंगेश्वर परिसरातील शाळेची सूत्रे हाती घेतली आणि आज ती संस्था शिक्षणातील आदर्श ठरली आहे.

**पगारातील हिस्सा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी – 'लिंगेश्वर पॅटर्न'चा जन्म!**

लिंगेश्वर विद्यालयातील सर्व शिक्षक आणि मुख्याध्यापक हाडवळे सर यांनी एक वेगळी परंपरा निर्माण केली. वर्षातील बारा महिन्यांपैकी चार महिन्यांचा पगार विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याचा त्यांनी संकल्प केला आणि आजही ती परंपरा कायम आहे.

शैक्षणिक साधनं, गरीब व बुद्धिमान विद्यार्थ्यांसाठी वह्या-पुस्तकं, गणवेश, परीक्षा शुल्क, शैक्षणिक सहली, प्रयोगशाळेचे साहित्य, संगणक शिक्षण अशा अनेक गोष्टींमध्ये या शिक्षकांनी स्वतःच्या खिशातून योगदान दिले.

हे केवळ सामाजिक उत्तरदायित्व नव्हे, तर 'शिक्षक म्हणजे देणं, घेणं नव्हे' याचं जिवंत उदाहरण आहे. हाडवळे सरांचा हा विचार "लिंगेश्वर पॅटर्न" म्हणून आज अनेक शिक्षकवर्गात प्रेरणादायी ठरला आहे.

**सेवानिवृत्ती म्हणजे अंत नव्हे – शिक्षणासाठीची अखंड साधना**

"सेवानिवृत्त झालो तरी शाळा आमची, आम्ही शाळेचे," अशी भावना व्यक्त करताना हाडवळे सरांच्या डोळ्यांत आजही विद्यार्थ्यांविषयीची ममत्वाची ओल दिसते. त्यांनी सांगितले की, "मी येथे नसणार असलो तरी शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या सुख-सुविधेसाठी शेवटपर्यंत प्रयत्नशील राहीन."

अनेक शाळा शासनाच्या योजना, अनुदान व धोरणांवर अवलंबून राहतात; पण हाडवळे सरांनी दाखवले की, खऱ्या अर्थाने शिक्षणाचा पाया हा शिक्षकांच्या समर्पणावर आणि पालकांच्या विश्वासावर उभा असतो.

**पालक व माजी विद्यार्थ्यांचा अभिमान – शिक्षकांचे दातृत्व प्रेरणादायी!**

आज लिंगेश्वर विद्यालयातील माजी विद्यार्थी आणि पालकवर्ग या शिक्षकांविषयी अभिमानाने बोलतात. "आमच्या शाळेला मोठ्या दात्यांची मदत नसली तरी आमचे शिक्षकच आमचे खरे दाते आहेत," असे ते म्हणतात.

हाडवळे सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तयार केलेला शिक्षणाचा पाया केवळ परीक्षेतील निकालापुरता मर्यादित नाही, तर तो संस्कार, स्वावलंबन आणि जबाबदारी या मूल्यांवर आधारित आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने केवळ शैक्षणिक नव्हे, तर सामाजिक जाणीव, पर्यावरण संवर्धन, विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाचे विविध उपक्रम राबवले आहेत.

**लिंगेश्वर विद्यालय – ग्रामीण शिक्षणाचे तेजस्वी उदाहरण!**

आज लिंगेश्वर विद्यालयाचा उल्लेख झाला की, प्रत्येकाच्या मनात 'लिंगेश्वर पॅटर्न' या आदर्श तत्त्वाची आठवण येते.

ही संस्था केवळ शिकवतेच नाही, तर विद्यार्थ्यांना जीवन जगण्याची दृष्टी देते. गोपीनाथ हाडवळे सरांनी आपल्या सहकाऱ्यांसह केलेल्या कार्यामुळे या विद्यालयाला एक नवी ओळख मिळाली आहे.

सेवानिवृत्तीच्या क्षणीही त्यांनी दिलेला संदेश – "विद्यार्थ्यांना आपणच घडवू शकतो, शासनावर नाही तर आपल्या कृतीवर विश्वास ठेवा" हा विचार प्रत्येक शिक्षकासाठी प्रेरणादायी ठरला आहे. अखेर, हाडवळे सरांची ओळख केवळ मुख्याध्यापक म्हणून नव्हे, तर 'शिक्षणासाठी आयुष्य वेचलेला एक समाजशिल्पकार' म्हणून राहील.

त्यांनी निर्माण केलेला 'लिंगेश्वर पॅटर्न' जर प्रत्येक गावात, प्रत्येक शाळेत राबविला गेला तर ग्रामीण शिक्षणाचा चेहरा नक्कीच उजळेल — हे नक्की. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लिंगेश्वर आदर्श विद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले या कार्यक्रमाच्या व परिसरात विविध फलक लावून भारताचे संविधान व विविध माहिती यावेळी फलकांद्वारे दिसून आली तर विद्यार्थ्यांनी आमचे शिक्षक आम्हाला कसे शिकवत होते याबद्दल त्यांनी मत व्यक्त केले हा सेवापूर्ती गौरव सोहळा म्हणजे एका शिक्षकाने आयुष्यभर केलेल्या कार्याची पावती त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या सन्मान व या सोहळ्यामध्ये अनेक मान्यवरांनी देणगी रूपाने दिलेली शाळेला मदत हा एक दुग्ध सरकार योग असून या ठिकाणी या शाळेला अनेक वर्षांपासून अपुरे असलेले स्वप्न शेवटी आयुष्यभर काम करत असताना माझी शाळा माझी मुले सुंदर शाळा हे स्वप्न अखेर एका शिक्षकांनी विद्यादान बंद केले तरी सामाजिक कार्याचा वसा हा मात्र शेवटपर्यंत नेण्याचा वसा मात्र ठेवला नाही हीच खरी ओळख शिक्षकांनी ग्रामीण भागात निर्माण केली याची ज्वलंत उदाहरण या ठिकाणी पहावयास मिळाले विशेष म्हणजे सेवापूर्ती गौरव सोहळा हा सरकारी सेवेतून घरी बसण्याचा व आयुष्य आनंदात जगण्याचा शान मात्र या क्षणाचे साक्षीदार बनले संपूर्ण तालुक्यातील शिक्षक प्रेमी व सामाजिक कार्यकर्त्यांनी व दातृत्व कर्तृत्व नेतृत्व असलेले सुरेशराव कोते यासह डझनभर कार्यकर्त्यांना या ठिकाणी उपस्थित राहून जो आनंद प्राप्त झाला तो नक्कीच गगनाला उंच भरारी देणारा ठरेल हे मात्र नक्की.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन उत्साहात साजरा !




**मुरंबी : (समर्थ गांवकरी)**

शासकीय माध्यमिक आश्रमशाळा मुरंबी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनानिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ४.०० वाजता शाळेच्या बहुउद्देशीय सभागृहात आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. शितल खंडे ह्या उपस्थित होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. विद्या पाहुणे मॅडम उपस्थित होत्या. या विशेष दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना श्री. सुभाष अस्वले सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी चित्रपट दाखविला. त्यानंतर शाळेतील पदवीधर शिक्षक श्री. सुहास डोंगरे सर, सौ. विद्या पाहुणे मॅडम आणि मुख्याध्यापिका सौ. शितल खंडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकरांच्या कार्य, शिक्षणप्रेम व संघर्षमय जीवनावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दशरथ वडाळ सर (माध्यमिक शिक्षक) यांनी कुशलतेने केले, तर आभार प्रदर्शन श्री. दौलत लहारे सर यांनी केले. शेवटी "वंदे मातरम्" या घोषणेने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि कर्मचारी यांच्या सहभागामुळे कार्यक्रम अत्यंत उत्साहवर्धक आणि प्रेरणादायी ठरला.



भुवनेश्वर : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.त्यांनी शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला.शिक्षणामुळे ज्ञानार्जनामुळे व्यक्तीचा विकास होतो.व्यक्तीच्या विकासातुन समाजाचा आणि समाजाच्या विकासातून देशाचा विकास घडतो. शिक्षणामुळे आणि ज्ञानार्जानामुळे व्यक्तीमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन वाढतो.विज्ञान आणि शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे.गरिबीचा उद्धार शिक्षणातुनच होतो.

## थोडक्यात बातम्या...



### काचळवाडी शिवसेना (उबाठा) शाखाचा ४१ वा वर्धापन दिन संपन्न

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : सावरगाव काचळवाडी येथे शिवसेना उभाटा शाखेचा ४१ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.शिवसेना शाखा क्रमांक ४ चा. वर्धापन दिन संपन्न होत असताना कट्टर शिवसैनिक आणि सावरगाव कुसुर गटाचे उप विभाग प्रमुख रामदास नायकोडी यांच्या मार्गदर्शनातून वर्धापन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख आणि कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक माऊली खंडागळे, उप तालुका प्रमुख सुनील पवार,उप तालुकाप्रमुख उत्तम काशीद,विभाग प्रमुख खंडू शिंदे,बस्ती माजी उपसरपंच रोहिदास गोरडे,सावरगाव शाखा प्रमुख तानाजी जुंदरे,काचळवाडी शाखाप्रमुख संजय काचळे उपशाखाप्रमुख शरद काचळे महिला आघाडी अध्यक्ष सुनिता शेणकर उपाध्यक्ष सपना जुंदरे, महिला आघाडी सल्लागार रेणुका वारे युवा संघटना अध्यक्ष अभिषेक नायकोडी तसेच माऊली काचळे केरभाऊ काचळे भानुदास काचळे भालचंद्र काचळे,शांताराम काचळे तसेच अनेक शिवसैनिक तरुण मित्र मंडळ महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### संपूर्ण ज्ञानेश्वरी हेच अद्भुत आश्चर्य : देशपांडे

नाशिक (स. गांवकरी) : 'संपूर्ण ज्ञानेश्वरी हेच अद्भुत आश्चर्य असून ज्ञानेश्वरीतील विविध रस अंतिमत: मोक्षसुखाकडे घेऊन जातात.'असे प्रतिपादन निरूपणकार पद्माकर देशपांडे यांनी केले. ते कलानगर येथील कृतार्थ ज्येष्ठ नागरिक संघात गुरुवार दि. 6 नोव्हेंबरच्या संध्याकाळी 'ज्ञानेश्वरीतील अद्भुत रस ' या विषयावर बोलत होते.यावेळी अध्यक्ष वासुदेव पांडे, उपाध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, कार्यवाह दिनकर कुलकर्णी, कोषाध्यक्ष श्रीकांत वडाळकर, पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पहिल्या अध्यायातील वीररस, तेराव्या अध्यायातील बिभत्स रसाची उदाहरणे देखील देशपांडे यांनी पेश केली. सभागृहातील श्रोत्यानी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी ज्येष्ठ चित्रकार भि. रा. सावंत यांनी पद्माकर देशपांडे यांचे रेखाचित्र उत्स्फूर्तपणे रेखाटले ते कृतार्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने देशपांडे यांना देण्यात आले. वक्त्यांचा परिचय जयश्री कुलकर्णी यांनी करून दिला तर सूत्रसंचालन दिनकर कुलकर्णी यांनी केले.



### सेवाभावातून वयोवृद्धांना नवसंजीवनी..!

- ब्राह्मणी येथे 'वयोश्री योजना' अंतर्गत आरोग्य तपासणी व मोफत सहाय्यक साधन शिबिर यशस्वी संपन्न..!

ब्राह्मणी (ता. राहुरी) (स. गांवकरी) : समाजसेवेचा अखंड ध्यास आणि वयोवृद्ध नागरिकांच्या आरोग्य व स्वावलंबनासाठीची बांधिलकी जपत, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन, अहिल्यानगर संचलित प्रधानमंत्री दिव्यांश केंद्र यांच्या वतीने 'वयोश्री योजना' अंतर्गत दोन दिवसीय भव्य आरोग्य तपासणी व सहाय्यक साधन वितरण शिबिर नुकतेच ब्राह्मणी येथे यशस्वीपणे पार पडले. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय (भारत सरकार), ॲलिम्को, कानपूर आणि ग्रामपंचायत ब्राह्मणी यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर २ व ३ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरादरम्यान एकूण ७२१ ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून, ते 'वयोश्री योजना'चे पात्र लाभार्थी ठरले आहेत. या लाभार्थ्यांना व्हीलचेअर, कमोड चेअर, श्रवणयंत्र, पाठीचा पट्टा, कमरेचा पट्टा, मानपट्टा, काठी इत्यादी विविध सहाय्यक साधनांचे विनामूल्य वितरण लवकरच करण्यात येणार आहे. या साधनांची एकूण अंदाजित किंमत ₹४७,१३,२३८ इतकी आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून मा. खा. डॉ. सुजय (दादा) विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत प्रधानमंत्री दिव्यांश केंद्र हे पुन्हा एकदा समाजसेवेचे आदर्श उदाहरण ठरले आहे. या केंद्रामार्फत दररोज अनेक वयोवृद्ध नागरिकांना आरोग्य सल्ला, वैद्यकीय मदत आणि सहाय्यक साधनांची सुविधा पुरविली जाते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायत ब्राह्मणीचे सरपंच सुरेश मानकर तसेच ॲलिम्को, कानपूर यांचे विशेष सहकार्य लाभले. या योजनेमुळे वयोवृद्धांच्या चेहऱ्यावर समाधान आणि स्वाभिमानाचे तेज पुन्हा झळकले.

# कारेगाव अतिक्रमणमुक्तीसाठी ग्रामस्थांचा रस्ता रोको

- प्रशासनाच्या निष्क्रिय भूमिकेविरोधात ग्रामस्थांचा संताप
- अधिकाऱ्यांचे तातडीने कारवाईचे आश्वासन



प्रशासनाच्या आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले असले तरी अतिक्रमणमुक्त कारेगावसाठीची त्यांची भूमिका ठाम असून पुढील काही दिवसांत ठोस पावले न उचलल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

कारेगाव येथील ग्रामस्थांनी अतिक्रमणमुक्त कारेगाव या मागणीसाठी शुक्रवारी सकाळी बीड–पाथर्डी राज्य मार्गावर जोरदार रस्ता रोको आंदोलन केले. कारेगाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच जालिंदर विष्णू दहिफळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

ग्रामस्थांनी प्रशासनावर गंभीर दुर्लक्षाचा आरोप करत तीव्र नाराजी व्यक्त केली. उपसरपंच दहिफळे यांनी अनेक वेळा लिखित तक्रारी देऊनही प्रशासनाने अतिक्रमणाबाबत कोणतीही ठोस कारवाई न केल्यामुळे अखेर ग्रामस्थ रस्त्यावर उतरले.या आंदोलनाचा केंद्रबिंदू अतिक्रमणमुक्त कारेगाव हा होता. गावातील पानंद व शिवरस्ते, मोहरी तलावाजवळील कॅनॉल सर्व्हिस रोड, नदीपात्रातील अतिक्रमणे, अनधिकृत उत्खनन, बीड–पाथर्डी रस्त्यालगत कारेगाव हद्दीतील दोन्ही बाजूंची अतिक्रमणे तसेच नगरपालिकेचा कचरा डेपो या सर्व मुद्द्यांवर आंदोलन करण्यात आले.

ग्रामस्थांनी सांगितले की, अतिक्रमणांमुळे अतिवृष्टीच्या काळात नदीच्या प्रवाहाचे पाणी अनेकांच्या घरात व शेतीत शिरले, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. मंजूर रस्त्यांवर अतिक्रमण असल्याने सुमारे ६० लाख रुपयांचा शासननिधी वापरात येऊ शकला नाही आणि तो परत गेला. मोहरी तलाव येथून जाणाऱ्या पाटातील सर्व चारी नादुरुस्त असून सिंचन विभागाकडे हस्तांतरणही झालेले नाही.

ग्रामस्थांनी नगरपालिकेच्या कचरा डेपोबाबतही संताप व्यक्त केला. डेपोमुळे परिसरात दुर्गंधी, दूषित वातावरण आणि आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अनधिकृत उत्खननावर महसूल विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचाही आरोप ग्रामस्थांनी केला.

या सर्व मागण्यांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. आंदोलन स्थळी नायब तहसीलदार रवींद्र शेकटकर, मंडलाधिकारी बाळासाहेब लटके, पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, लक्ष्मण पवार,नगरपालिकेचे सचिन राजभोग, जलसंपदा विभागातील नीता खाडे, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संजय गीऱ्हे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे बालाजी ढोले, भूमी अभिलेखचे राजेंद्र दहिफळे आदी प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

आंदोलनात अशोक दहिफळे, भगवान दहिफळे, किसनदेव भाबड, बाबा राजगुरू, तुकाराम दहिफळे,अमोल भाबड, संजय अश्रू दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, मारुती दहिफळे,सदानंद दहिफळे, संदीप भाबड,आश्रुबा भाबड,आजिनाथ पोटे, भगवान इघारे,अर्जुन इघारे, सुखदेव भाबड,भाऊसाहेब दहिफळे,नवनाथ चातुर,बबन शिवनाथ दहिफळे आदी उपस्थित होते.लवकरच सर्व कामे मार्गी लावू असे प्रशासनाने आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

# सुनील शेळके यांचे निधन

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील पानसरवाडी येथील सुनील बाळचंद शेळके वय वर्षे ५३ यांचे बुधवार दि. २२ ऑक्टोबर २०२५ रोजी वेदांत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अकोले येथे उपचारा दरम्यान निधन झाले. रिक्षातून उतरत असताना चक्कर येऊन पडल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने सुरुवातीला अकोलेतील डॉ. भांडकोळी हॉस्पिटल येथे प्राथमिक उपचार घेऊन त्यांना संगमनेरमध्ये आरोटे हॉस्पिटल येथे हलविण्यात आले. परंतु डोक्याला गंभीर मार असल्याने मेंदूच्या शस्त्रक्रियेसाठी त्यांना पुणे येथील के. ई. एम हॉस्पिटल येथे हलविण्यात आले. तेथे त्यांच्यावर मेंदूची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. व नंतर अकोलेतील वेदांत हॉस्पिटल येथे त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली.



त्यांच्या पश्चात पत्नी, आई,वडील, दोन भाऊ, भावजय, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर पानसरवाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मा. नगरसेवक परशुराम शेळके आणि सुरेशराव यांचे ते बंधू होते.

# भटके कुत्रे महापालिकेत सोडू : ॲड. रोहिदास मुंडे

- दिवा शहरात भटक्या श्वानांचा उछाद

**ठाणे,दिवा : (समर्थ गांवकरी)**

नुकतेच सुप्रिम कोर्टाने भटक्या कुत्र्यांना सार्वजनिक ठिकाणाहून हटवा व त्यांची नसबंदी करून निवारागृहात ठेवा असा महत्वपूर्ण आदेश काढले असताना...दिवा परिसरात भटक्या कुत्र्यांचा प्रचंड सुळसुळाट झाला असून यामुळे नागरिकांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काल संध्याकाळी दिवा शहरातील काळुबाई बिल्डिंग, विकास म्हात्रे गेट परिसरात दोन वर्षांची बालिका वेदा विकास काजारे ही चालत



असताना अचानक एका भटक्या कुत्र्याने तिच्यावर मागून हल्ला केला. या हल्ल्यात लहानगी वेदाला गंभीर जखमा झाल्या असून कुटुंबीयांनी तिच्यावर तातडीने उपचार सुरू केले आहेत. कु.वेदा हिची आई मीनाक्षी व वडील विकास दगडू काजारे पूर्णतःह भयभीत झाले असून घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या संदर्भात ठाकरे शिवसेनेचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख ॲड. रोहिदास मुंडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की "दिवा विभागात भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणाबाहेर गेलेली आहे. वारंवार तक्रारी करूनही महापालिका प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. निष्पाप लहान मुलीला इतक्या गंभीर स्वरूपात जखमी करूनही प्रशासन शांत बसले आहे.

जर महापालिकेने तात्काळ भटके कुत्रे पकडण्याची व त्यांच्यावर योग्य प्रक्रिया राबवण्याची तातडीने कार्यवाही केली नाही, तर नागरिकांच्या सुरक्षेसाठी परिसरातील सर्व भटके कुत्रे गोळा करून थेट महापालिका कार्यालयात सोडण्यात येतील असे ॲड.रोहिदास मुंडे यांनी इशारा दिला आहे. प्रकरणी दिवा परिसरातील नागरिकांनी देखील प्रशासनाने या घटनेची दखल घेऊन त्वरित कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

# आदिवासी भागात भात कापणीला सुरुवात

- सात ते आठ महिन्यांच्या पावसानंतर शेतकऱ्यांची धावपळ सुरू!

**कोतुळ : (समर्थ गांवकरी)**

आदिवासी भागात सध्या पारंपरिक पद्धतीने भात कापणीला सुरुवात झाली आहे. सात ते आठ महिन्यांपासून सलग सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. आता पावसाचा जोर ओसरल्यानंतर शेतकरी आपल्या हातात आलेल्या पिकाची कापणी करण्यास गडबडीत आहेत.

आजही ग्रामीण व आदिवासी भागातील सुमारे ७० ते ८० टक्के कुटुंबांचे जीवन हे शेतीभोवतीच फिरते. त्यातही भात शेती हे



त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन आहे. शेतकऱ्यांचे जीवन हे अत्यंत कष्टमय, जिद्दी आणि साधेपणाने भरलेले असते. तो सकाळी लवकर उठतो आणि संपूर्ण दिवस शेतात राबतो. ऋतू कोणताही असो — उन्हाळा, पावसाळा किंवा हिवाळा — त्याचे काम कधीच थांबत नाही.

मागील काही आठवड्यांतील अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. तोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतला आहे. त्यामुळे आता शेतकरी पावसावर भरोसा ठेवत नाहीत. सोयाबीनची काढणी सुरू झाल्याने मजुरांची टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी अवजारांच्या साहाय्याने स्वतःच भाताची कापणी सुरू केली आहे.

या भागातील भाताचे पीक हे पारंपरिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. अनेक शेतकरी म्हशींच्या साहाय्याने भाताची झोडपणी करून धान्य आपल्या पदरात पाडून घेत आहेत. शेतकऱ्यांच्या या मेहनतीतून आणि जिद्दी वृत्तीतूनच खऱ्या अर्थाने 'अन्नदाता' या शब्दाचा अर्थ उलगडतो. सततच्या पावसात, अपुऱ्या सुविधांमध्येही हे शेतकरी आपल्या मेहनतीने पोटभर अन्न तयार करत आहेत — याला सलाम करावाच लागेल!

# तालुका पतसंस्था फेडरेशनचे प्रशिक्षण संपन्न

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सहकार चळवळीसाठी दिलेल्या आदर्श तत्वांचे पालन संगमनेर मधील सहकार संस्थांमध्ये केले जात आहे यामुळे सर्व सहकारी संस्था ह्यात आदर्शवत आहेत. सहकार चळवळ ही जनतेच्या विकासाचे साधन असून ती जपली पाहिजे असे सांगताना तालुक्यातील बँका व पतसंस्था मिळून 9500 कोटींच्या ठेवी हे तालुक्याच्या समृद्धीचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन माजी महसूल व कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे. सहकार महर्षी अमृतवाहिनी सहकारी बँकेत संगमनेर तालुका पतसंस्था फेडरेशन च्या वतीने संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न झाले यावेळी ते बोलत होते यावेळी अध्यक्षस्थानी मा. आमदार डॉ. सुधीर तांबे हे होते तर व्यासपीठावर बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, फेडरेशनचे अध्यक्ष बापूसाहेब टाक, ॲड नानासाहेब शिंदे.

# सहकार्य व स्पर्धात्मक वातावरण कामामधील गती व अचूकता वाढवते

- शिक्षण विस्ताराधिकारी रामनाथ कराड
- शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न



**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

शिक्षक व शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत साठी विविध पातळ्यांवर यशस्वी प्रयत्न शासनाकडून सुरू आहेत. परस्पर समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मक वातावरण, कामामधील गती व अचूकता वाढवते असे मत शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड कराड यांनी व्यक्त केले.

राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण संस्था, जिल्हा परिषद, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर व पंचायत समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुक्यातील शिक्षक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रीडा स्पर्धा आव्हाड महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर शुक्रवारी संपन्न झाल्या. आगामी महिनाभर एकूण 43 प्रकारात होणाऱ्या स्पर्धेत विविध अधिकारी शिक्षक व कर्मचारी सहभागी होणार आहेत. सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धा घेऊन तालुकास्तरीय स्पर्धांचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ .बबन चौरे यांच्या हस्ते संपन्न झाले.

तालुकास्तरीय स्पर्धा समितीचे अध्यक्ष शिवाजी कराड , मुख्याध्यापक शरद मेढे, पर्यवेक्षक सलीम शेख यासह समितीचे सदस्य उपस्थित होते. या महिन्याच्या प्रत्येक शुक्रवारी व शनिवारी वर्धा संपन्न होणार आहेत. आज सांघिक स्पर्धा, खो खो, व्हॉलीबॉल, वैयक्तिक स्पर्धा, गोळा फेक, थाळीफेक, लांब उडी, उंच उडी अशा स्पर्धा संपन्न झाल्या. विजयी संघ व वैयक्तिक प्रकारात प्रथम आलेले स्पर्धक विभागीय स्तरावर पात्र ठरविण्यात आले आहेत. आजच्या स्पर्धांमध्ये अनेक महिला शिक्षकांनी सुद्धा उत्साहाने सहभाग नोंदवला.

यावेळी बोलताना कराड म्हणाले, एकसारख्या वातावरणात राहून मानसिक तणाव वाढत त्याचा कामकाजावर परिणाम दिसू लागतो. मानसिक व शारीरिक तंदुरुस्ती कामकाज सुद्धा प्रभावीपणे व अचूकपणे पुढे चालवत राहते. यातून सकारात्मक भावना वाढीस लागून सांघिक पणे काम करण्याची विचारसरणी सुद्धा विकसित होते. विशिष्ट वयानंतर खेळाकडे दुर्लक्ष होऊन नाविन्याचा शोध घेण्यासाठी सुद्धा फारसे कोणी लक्ष देत नाही. सोशल मीडियाच्या जमान्यात खेळ हा प्रकार इतिहास जमा होत चालला आहे. प्रत्येक व्यक्तीने शालेय जीवनामध्ये विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग नोंदवला. त्याची उजळणी सुद्धा या निमित्ताने होऊन जुन्या आठवणींमध्ये खेळाडू स्वतःला हरवून गेले. ग्रामीण भागामध्ये प्रदूषण विरहित हवामान आहे त्यामुळे कर्मचाऱ्यांना फारशा समस्यांना तोंड द्यावे लागत नाही, मात्र शहरी भागामध्ये सर्वच प्रकारचे प्रदूषण असल्याने काम करण्याच्या शारीरिक क्षमतेवर सुद्धा परिणाम होऊन भावनिक तणाव सुद्धा लवकर वाढतो. या सर्वांवर जालीम उपाय म्हणून खेळांमधील सर्वांचाच सहभाग वाढणे आवश्यक आहे, असे कराड म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड, सूत्रसंचालन सचिन शिरसाट तर आभार रवी डाळिंबकर यांनी मानले.

# दिवाळीच्या सुट्ट्यामुळे साईबनमध्ये गर्दी

**नगर : (समर्थ गांवकरी)**

सध्या चालू असलेल्या दिवाळीच्या सुट्टीमुळे नगरमधील एमआयडीसी च्या मागे असणार्या साईबन कृषी पर्यटन केंद्रात सध्या रोज मोठी गर्दी होत असून येथील बंधार्यात चांगले पाणी आहे त्यामुळे साईबनमध्ये सध्या रोज पर्यटकाची व नगरकराची गर्दी होत आहे,साईबन मधील तलावात बोटिंगची सोय आहे त्यामुळे नगरकरांना अगदी जवळ बोटिंगचा आनंदहि मिळत आहे .तसे नौकाविहार करणे सर्वांनाच आवडते तसे प्राणी पक्षी हि पाणी पिण्यासाठी येथे येतात त्याचे दर्शन हि या ठिकाणी होते. नगर शहराच्या जवळ तशी पण कोठे बोटिंगची सोय नाही. नगरमध्ये येणारे पाहुणे, पर्यटक एक दिवसासाठी साईबनमध्ये भेट देतात व बोटिंग बरोबर इतरही खेळाचा आनंद घेतात. साईबनच्या तलावात विहंगणाऱ्या बोटींची सफर हे आत्ता सगळ्याचे आकर्षण ठरले आहे . तसेच सुरक्षारक्षक पण येथे असतात,

साईबनमध्ये हुरडा पार्टी लवकरच सुरु होणार आहे, तसेच शाळांच्या सहली हि मोठ्या प्रमाणात येत आहेत, पपेट शो आणि उंटाची गाडी हे एक विशेष आकर्षण आहे.डोनाल्ड डक,मिकी माउस ,व अलिबाबाची गुहा आणि उंच उंच टेकड्या,त्याच्या बाजूने जाणारया रेल्वे गाडीचा कर्कश आवाज आणि मोहित करणारे परिसरातील संगीत, जुन्या नव्या गाण्यांची रेलचेल हे सर्व आकर्षित काणारे आहेत.

म्हणूनच नगर जिल्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील परिवार स्नेही मोठ्या संख्येने साईबानला येत आहेत निसर्गरम्य असणारे वातावरण तसेच झाडी व शुद्ध हवा यामुळे मन प्रसन्न राहते.





पुणे : सेंट व्हिन्सेंट हायस्कूल आणि लोयोला एचएस संघांनी सर्वोत्तम कामगिरी करत लोयोला फुटबॉल कप २०२५ स्पर्धेमध्ये पाचव्या दिवशी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले. शनिवारी दोन गोल हॅटट्रिकची नोंद झाली. पहिली हॅटट्रिक परम भार्गवने सेंट व्हिन्सेंट एचएससाठी केली.

## थोडक्यात बातम्या...



### विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून शाळा प्रवेश दिन साजरा

नांदेड (स. गांवकरी) : शहरातील रेल्वे स्थानक परिसरातील वास्तव्यास असलेल्या वंचित बेघर कुटुंबातील विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेशा दिनानिमित्त युवा साहित्यिक सोनू दरेगावकर यांच्या वतीने, दिनांक ७ नोव्हेंबर रोजी. शालेय साहित्याचे वाटप करून शाळा प्रवेश दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ७ नोव्हेंबर १९०० हा दिवस भारतीय समाजाच्या इतिहासातील एक प्रेरणादायी क्षण ठरला. या दिवशी साताऱ्यातील प्रतापसिंग प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रवेश झाला होता. त्यामुळे ७ नोव्हेंबर हा दिवस 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी प्रवेश दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त नांदेड शहरातही हा दिवस युवा साहित्यिक सोनू दरेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली भटक्या समुदायातील चिमुकल्यांना वह्या, पुस्तक, पेन देऊन हा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी, राहुल वाघमारे, दत्तप्रसाद तालीमकर व आदींची उपस्थिती.

### पत्नीचा खून केल्याप्रकरणी पतीस शिक्षा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : पत्नीचा निघृण खून केल्याप्रकरणी आरोपी पतीस येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश सी. एम. बागल यांनी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. तसेच त्यास एक हजार रूपये दंड आणि दंड न भरल्यास एक महिन्याच्या साध्या कारावासाचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. बाबासाहेब विठ्ठल गोलवड (वय ३८, रा. आंबी स्टोर, देवळाली प्रवरा, ता. राहुरी) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. सरकार पक्षातर्फे अतिरीक्त सरकारी वकील अनिल एम. घोडके यांनी युक्तिवाद केला. सदर घटना १६ ऑक्टोबर २०२० रोजी रात्री ११.३० वाजताच्या सुमारास देवळाली प्रवरा येथे आरोपीच्या राहत्या घरी घडली होती. बाबासाहेब गोलवड यास दारू पिण्याचे व्यसन होते. त्याची पत्नी शितल गोलवड ही मजुरी करून घरखर्च भागवीत असे. आरोपी वारंवार पत्नीकडे दारू पिण्यासाठी पैशांची मागणी करत असे. घटनेच्या रात्री शितल हिने पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपी संतापला आणि लाकडी दांडक्याने तिच्या डोक्यावर व कपाळावर वार करून तिचा जागीच खून केला. ही भीषण घटना आरोपीचा मुलगा स्वप्निल गोलवड याने प्रत्यक्ष पाहिली. मुलांच्या आरडाओरडीनंतर शेजारी धावत आले, मात्र आरोपी पळून गेला. या प्रकरणी विजय एकनाथ बर्डे (रा. सडे, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक सचिन बागुल यांनी तपास करून आरोपीविरूध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. या प्रकरणात फिर्यादी, पंच, आरोपीचा मुलगा, स्थानिक नगरसेवक, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी या साक्षीदारांच्या ठोस साक्षी व पुराव्यांवर आधारित युक्तिवादानंतर न्यायालयाने आरोपी दोषी असल्याचे मान्य केले. जिल्हा सरकारी वकील सतिश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सरकार पक्षातर्फे ॲड. घोडके यांनी प्रभावीपणे युक्तिवाद केला. यात पैरवी अधिकारी पोलीस अंमलदार मुख्तार कुरेशी, सीमा रजपूत, योगेश वाघ यांनी सरकारी पक्षास सहकार्य केले.

### मोर्चात मातंग बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : विजय पठारे



अहिल्यानगर (स. गांवकरी) : नियमितच्या अन्याय अत्याचाराने त्रस्त झालेल्या समाजाच्या मते अहिल्यानगर पुर्वीचा अहमदनगर जिल्हा बांडगुळांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. कारण कौलाओघात जिल्ह्यातील बऱ्याच तालुक्यांत जात्यांध मानसिकता खचाखच भरलेली आहे यापूर्वीच्या बौद्ध, मातंग बहुजन समाजावरील अन्याय अत्याचाराने जिल्ह्याचे नाव देशाच्या नकाशावर स्पष्टपणे झळकले आहेत आताही समाजावर निरंतर अन्याय, अत्याचार होत आहे. नुकतेच नेवासा तालुक्यातील सोनई येथे मातंग समाजाची हिंदुत्वाची वज्रमूठ उघडली आणि येथील संजय नितीन वैरागर नावाच्या युवकास तेथील जात्यांध मानसिकता असलेल्या गावगुंडांनी जीवे मारण्याचा प्रयत्न केला.हा अन्याय अत्याचार थांबवण्यासाठी आमचा प्रयत्न चालला आहे. त्या कारणाने आमच्या मातंग समाजाच्या खुप कुटुंबावर खेड्यापाड्यानी खुप अन्याय, अत्याचार होतो. आता तर आमच्या जातीवर देखील शिव्या देणं सुरू झाले आहे आम्हाला विनाकारण लक्ष केले जातेय. जे गावगुंड हि अन्याय अत्याचाराची मालिका सुरू ठेवण्याचा प्रयत्न करत आहे त्याला उत्तर देण्यासाठी १० नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर येथे लालटाकी येथील वीर लहुजी चौकात भव्य मोर्चाचे आयोजन केले आहे. या मोर्चात समाजबांधवांनी मोठ्या संख्खेने सहभागी व्हावे असे आवाहन समाजाचे नेते विजय पठारे यांनी केले आहे. सध्या जिल्ह्यात अनेक ठिकाणी समाबांधवार अन्याय होत आहे. हा अन्याय दुर करून अन्याय करणाऱ्याला त्याची जागा दाखवणे आवश्यक आहे.अहिल्यानगर येथे होत असलेल्या मोर्चात मातंग बांधवानी, ज्याच्या मनात मातंग समाजा विषयी तळमळ आहे. जातीचे काही देणे लागत असेल तर त्या सर्वानी उपस्थित राहावे. ज्या गावगुंडांनी मातंग जातीला, समाजाला शिवीगाळ केली त्याला उत्तर देण्यासाठी मातंग समाजा बरोबरच इतर समाजावर देखील अन्याय होत असेल तर त्यानी देखील मोर्चात लक्षणीय संख्येने सहभागी व्हावे.असे आवाहन मातंग समाजाचे नेते विजय पठारे यांनी केले आहे. आझाद समाज पार्टीचे संगमनेर तालुका अध्यक्ष अमोल शेळके यांनी देखील बौद्ध आदीवासी बांधवांना एकत्र येऊन मोठ्या संख्येने मोर्चात सामील व्हावे असे आवाहन केले आहे.

# १५० वर्षांच्या तेजस्वी प्रवासाचे किनवटमध्ये भव्य सेलिब्रेशन

- 'वंदे मातरम्'चा अमृत-जयघोष!
- प्रो. डॉ. मार्तंड कुलकर्णी यांचे प्रेरणादायी विचार; सौ. शारदा चौंडेकर यांच्या अध्यक्षतेखाली 'सार्ध शताब्दी सोहळा' उत्साहात



**किनवट : (समर्थ गांवकरी)**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रेरणास्त्रोत आणि राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम्' या अमर गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने हुतात्मा गोंडराजे शंकर शाह–रघुनाथ शाह शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, किनवट यांच्या वतीने संस्थेच्या क्रीडांगणावर भव्य 'सार्ध शताब्दी सोहळा' मोठ्या उत्साहात पार पडला.

या ऐतिहासिक कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून प्रो. डॉ. मार्तंड कुलकर्णी उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी तहसीलदार शारदा चौंडेकर होत्या. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन उत्तम कानिंदे यांनी केले. 'वंदे मातरम्' गीताचे मुख्य गायन सुरेश पाटील आणि स्थानिक शाळांतील शिक्षक-विद्यार्थ्यांनी सादर करून वातावरण देशभक्तीच्या भावनेने भारून टाकले.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे गट निदेशक नितीन देशपांडे यांच्या ओघवत्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी १८७५ ते २०२५ या काळातील 'वंदे मातरम्' गीताचे सामाजिक आणि राजकीय महत्त्व विशद केले. "हे गीत फक्त स्वातंत्र्याची हाक नव्हती, तर मातृभूमीचे प्रतीक म्हणून भारतीय मनात राष्ट्रप्रेम रुजवणारा पहिला महामंत्र होता," असे ते म्हणाले.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले ते 'वृक्ष-भेट' उपक्रम. अध्यक्ष सौ. चौंडेकर यांच्या हस्ते व्यासपीठावरील मान्यवरांना स्मृतीचिन्हाऐवजी रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. देशपांडे यांनी हा उपक्रम "सुजलां सुफलां भारतमातेचे पर्यावरणपूरक रूप जतन करण्याचे प्रतीक आहे" असे सांगितले.

डॉ. कुलकर्णी यांचे विचारधन: 'वंदे मातरम्' हा कर्तव्याचा मंत्र

प्रमुख वक्ते प्रो. डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी आपल्या प्रभावी भाषणातून 'वंदे मातरम्'चा आधुनिक दृष्टिकोन मांडला. ते म्हणाले, "बँकिमचंद्र चॅटर्जींचे स्वप्न आज विकसित भारताच्या रूपाने साकार करणे हीच खरी देशसेवा आहे. वंदे मातरम् हा केवळ मातृभूमीला वंदन करण्याचा शब्द नाही, तर तो कर्तव्य, समर्पण आणि राष्ट्रनिष्ठेचा प्रेरणामंत्र आहे. युवकांनी प्रादेशिक व राजकीय सीमांच्या पलीकडे जाऊन राष्ट्र सर्वोपरी मानावे."

अध्यक्ष तथा तहसीलदार शारदा चौंडेकर यांनी विद्यार्थ्यांना कौशल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे राष्ट्रसक्षमीकरणात योगदान देण्याचे आवाहन केले. या सोहळ्यातील सर्वोच्च क्षण ठरला 'वंदे मातरम्' गीताचे सामूहिक गायन सुरेश पाटील यांच्या दमदार आवाजात सुरू झालेल्या या गीतात शिक्षक-विद्यार्थ्यांनी उत्साहाने साथ दिली. 'सुजलां सुफलां, सस्यश्यामलां' हे शब्द हजारो उपस्थितांनी एका सुरात गायले तेव्हा संपूर्ण क्रीडांगण देशभक्तीच्या जयघोषाने दुमदुमून गेले. उत्तम कानिंदे यांनी आभार प्रदर्शन करत अध्यक्ष, प्रमुख वक्ते, कलाकार, आयोजक, तांत्रिक विभाग तसेच उपस्थित नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम्'च्या अखंड जयघोषात झाली. १५० वर्षांच्या तेजस्वी वारशातून प्रेरणा घेत "विकसित भारत" घडविण्याचा संकल्प या सोहळ्यात करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वंदे मातरम् सार्ध शताब्दी समिती, किनवट चे अध्यक्ष सौ. शारदा चौंडेकर, सचिव सुभाष परघणे तसेच सदस्य एस.एस. राठोड, उल्हास जाधव, एस.ए. शेळके, अनिलकुमार महामुनी, प्रशांत ठमके, प्रो. डॉ. मार्तंड कुलकर्णी, उद्धवराव रामतीर्थकर आणि संस्थेचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# भिंगार समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

भिंगार येथे सकल मातंग समाजाच्या वतीने १० नोव्हेंबर रोजी विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर महा मोर्चाच्या आयोजन केले आहे.त्या संदर्भात आज समाज बांधवांची मिटिंग आयोजित करण्यात आली होती.यामध्ये समाजातील बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने महामोर्च्यात सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी रामभाऊ वडागळे, विजय पठारे,सुनील उमाप, निलेश सरोदे,रोहित कुचेकर,यश शेलार आदींनी आपले मनोगत व्यक्त केले व मोर्चा संदर्भातील भूमिका स्पस्ट केली.विशेषतःसोनई प्रकरणावरून समाजामध्ये मोठा असंतोष आहे,सातत्याने होणार अन्याय विरोधात सर्व समाजाने एकत्र व्हावे असे आवाहन विजूभाऊ पठारे यांनी यावेळी केले . आता मातंग समाजाला जाहिर सभेत शिवीगाळ होऊ लागली, त्याच्यावर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अनु. जातीचे अ.ब.क.ड व वर्गीकरणाची त्वरीत घोषना करावी,संजर वैरागर हल्ला करणाऱ्यांवर मोका अंतर्गत गुन्हे दाखल करून कुटुंबास पोलीस संरक्षण दयावे.

# जय मल्हार विद्यालयाचे नवीन इमारत बांधकामाला निधीची गरज

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पिंपळगावरोठा ता.पारनेर येथील जय मल्हार विद्यालया शाळा नवीन इमारतीचे उर्वरित बांधकाम पूर्ण करणेसाठी मोठ्या निधीची गरज आहे.असे जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव एड. पांडुरंग गायकवाड व मुख्याध्यापक यु.जी सुंबरे, शिक्षक व कर्मचारी वर्ग यांनी प्रसिद्धीला दिले आहे. विद्यालयाचे माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक, ग्रामस्थ, शिक्षक आणि कर्मचारी यांनी १८ फेब्रुवारी २०२३ रोजी महाशिवरात्री पर्वात मेळावा आयोजित करून विद्यालयाची नवीन भव्य इमारत बांधण्याचा संकल्प सर्वांनी मिळून केला होता.त्यानुसार ऑगस्ट २०२३ मध्ये प्रत्यक्ष इमारतीचे



कामाला जमीन खोदण्याने सुरुवात झाली. सुरुवातीलाच जय मल्हार विद्यालयाचे शिक्षक व कर्मचारी यांनी स्वइच्छेने एक महिना पगाराची पूर्ण रक्कम रुपये ७.५० लक्ष रुपये देऊन देणगी व मदतीचा श्री गणेशा केला होता.त्यानंतर शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ यांनी पुढाकार घेऊन शाळा इमारत बांधकामासाठी निधी मिळणे कामी मोठे सहकार्य दिले.त्यामुळे नवीन इमारतीचे तळमजला, १ ला मजला, २ रा मजला वीट बांधकाम व आतील प्लास्टर चे काम झाले आहे.एकूण १०,३४५ चौरस फूट बांधकाम असून दुसरा मजला वीट बांधकाम प्लास्टर चे काम चालू आहे. उर्वरित राहिलेली संपूर्ण इमारतीचे बाहेरील प्लास्टर, लादीकाम,रंगकाम,सॅनिटरी फिटिंग,इलेक्ट्रॉनिक फिटिंग, सोलर शेड, कंपाऊंड गेट,पाणी साठवून टाकी,प्लंबिंग इत्यादी कामासाठी मोठा निधीची रुपये ८५ लाख ची गरज असल्याचे निवेदन जय मल्हार विद्यालय आणि जय मल्हार शिक्षण प्रसारक संस्था यांचे तर्फे माजी विद्यार्थी, पालक, देणगीदार, कंपनी, संस्था उद्योजक हितचिंतक इ.केले आहे.इच्छुक देणगीदारांना आयकर कलम 80 जी खाली देणगीदार कर सवलत सुविधा लागू आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडिया संस्थेचे बचत खाते नंबर 5414747333 असून IFSC कोड CBIN0281860 या नंबर वर ऑनलाइन देणगी देता येईल.

# भोकर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन साजरा

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

दि. ७ नोव्हेंबर रोजी संबोधी परिसर श. प्रफुल नगर येथील सम्यक बुद्ध विहार समितीच्या प्रांगणात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अजन्म विद्यार्थी होते. त्यांच्या अथक ज्ञानसाधनेमुळे त्यांचे आधुनिक भारताच्या निर्माण प्रक्रियेत अमूल्य योगदान लाभले आहे. ही बाब विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याने सन २०१७ पासून



त्यांचा ७ नोव्हेंबर हा शाळा प्रवेशदिन राज्यात 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्याच अनुषंगाने येथील संबोधि परिसर, श. प्रफुल नगर येथे दि. ७ रोजी सायंकाळी ७:००वाजता सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सम्यक बुद्धिस्ट ट्रस्टचे पदाधिकारी, परिसरातील बौद्ध उपासक उपासिका तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार वाहून अभिवादनआणि बुद्ध वंदनेचे पठण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक ॲड. आर के कदम यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून प्रस्तुत कार्यक्रमाच्या आयोजनाचा हेतू स्पष्ट करताना सांगितले की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर अस्पृश्यतेचे असहाय्य चटके सहन करीत भारतासह जगातील नामवंत विद्यापीठातून प्राप्त केलेल्या अखंड ज्ञानसाधनेच्या प्रचंड सामर्थ्यामुळे ते आधुनिक भारताचे शिल्पकार ठरले. तसेच त्यांनी केलेला ज्ञान साधनेचा खडतर प्रवास शैक्षणिक प्रवाहात असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रेरणा देणारी असल्याचे सांगितले. जे डी वाघमारे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे बालपण याविषयी मार्गदर्शन करताना बाल वयातील बाबासाहेबांनी आपल्या वडिलांकडे वेगवेगळ्या पुस्तकांची केलेली मागणी, त्यांचा वाढत असलेला व्यासंग, आणि प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी केलेला अभ्यास याबद्दल अभ्यासपूर्ण मांडणी केली.

यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना सम्यक बुद्धिस्ट ट्रस्टच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी दिगंबर कदम, गौतम कावळे, प्रकाश सोनकांबळे, विकास क्षीरसागर, आनंदराव गोणेकर, अरविंद कांबळे, सुधांशू कांबळे, धम्मा कावळे, उमाकांत एडके, बापूराव कदम, मिलिंद तेले , गोविंद थोरात, प्रकाश वाघमारे, महानाम गायकवाड, प्रा.सुमंगल कदम, सतीश जाधव आदीसह रेखाबाई मुनेश्वर, सावित्राबाई जाधव, ज्योती कदम, वंदना तेले, भारत टिकेकर, निकिता एडके, वैशाली थोरात, संगीता कावळे आदी उपासक उपस्थित होते.

# सुजित झावरे यांचा खासदार निलेश लंके यांना धक्का

- उद्योजक संदीप रोहकले विश्वासू सहकारीच लावला गळाला
- ढवळपुरी गटात व गणात राजकारण फिरणार

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

सुजित झावरे पाटील यांनी दोन दिवसापूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात पारनेर येथे मोठे शक्ती प्रदर्शन करत जाहीर प्रवेश केला. त्यांच्या या प्रवेशाने तालुक्याच्या राजकारणात स्थित्यंतर होणार हे लक्षात आलं होत. भाळवणी येथील मोठे उद्योजक वैभव डेरीचे सर्वेसर्वा संदीप रोहकले यांनी सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटामध्ये जाहीर प्रवेश केला. संदीप रोहकले हे गेल्या आठ वर्षापासून खासदार



निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली काम करत होते परंतु न्याय मिळत नसल्याने ते नाराज होते. स्थानिक राजकारणात संदीप रोहकले यांचे मोठे वजन आहे भाळवणी परिसरात शेतकरी हितासाठी ते नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात. दूध व्यवसायाच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी त्यांचा थेट संपर्क आहे. संदीप रोहकले यांनी अचानकपणे सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यामुळे खासदार निलेश लंके गटाला पारनेर तालुक्यातील भाळवणी परिसरात मोठा धक्का बसला आहे. रोहकलेंसारखे एक सर्वसमावेशक नेतृत्व शिवसेनेत आल्यामुळे सुजित झावरे यांची भाळवणी परिसरात मोठी ताकद वाढली आहे. हा प्रवेश कार्यक्रम वासुंदे येथे झाला. यावेळी भाळवणी गावचे उद्योजक संदीप कपाळे माजी सरपंच ठकचंद रोहकले माजी उपसरपंच पिनु रोहकले तसेच वासुंदे येथील ग्रामस्थ शिवसेना समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुजित झावरे पाटील यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर तालुक्यातील राजकारणच फिरले आहे कारण त्यांनी पारनेर येथे घेतलेल्या सभेला 15000 पेक्षा जास्त लोकांनी उपस्थिती लावल्याने त्यांची खरी तालुक्यातील ताकद दिसून आली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात सुजित झावरे यांच्या गटात मोठ्या संख्येने आणखीन प्रवेश होतील आता हे सांगण्यासाठी राजकीय जाणकाराची किंवा भविष्यकाराची गरज राहिलेली नाही. भाळवणी परिसरात खासदार निलेश लंके यांचा विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जाणारे उद्योजक संदीप रोहकले यांना शिवसेना पक्षात सुजित झावरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश देत उद्योजक संदीप कपाळे यांनी भाळवणी परिसरात मोठी राजकीय खेळी खेळली आहे. आता संदीप रोहकले हे सुजित झावरे पाटील यांचे भाळवणी गणातील संभाव्य उमेदवार असतील ते सांगण्यासाठी भविष्यकाराची गरज नाही.

### उद्योजक संदीप रोहोकलेच्या प्रवेशाचा होणार फायदा

उद्योजक संदीप रोहकले हे शांत संयमी व प्रभावशाली व्यक्तिमत्व म्हणून भाळवणी परिसरात ओळखले जातात सामाजिक कामांच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य वर्गामध्ये आपली एक चांगली ओळख निर्माण केली असून शेतकरी वर्गाशी दूध व्यवसायाच्या माध्यमातून त्यांचा असलेला संपर्क हा खऱ्या अर्थाने त्यांची जमेची बाजू आहे शिवसेना शिंदे गटात त्यांनी प्रवेश करत सुजित झावरे पाटील यांच्या पाठीमागे मोठी ताकद उभी करणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे संदीप रोहकले यांच्या प्रवेशाने झावरे पाटील यांना ढवळपुरी जिल्हा परिषद गटातच मोठा फायदा होणार आहे.

# वंदे मातरम 150 वर्ष गौरव सोहळा निमित्त व्यापक बैठक संपन्न




**रावेर : (समर्थ गांवकरी)**

जळगाव भाजपतर्फे वंदेमातरम् या गिताला १५० वर्ष झाल्याने डॉ उल्हास पाटील वैदकिय माहाविद्यालय , जळगाव खुर्द येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी ना गिरीषभाऊ महाजन (जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री) यांच्या मार्गदर्शनाखाली, केंद्रीय मंत्री ना.श्रीमती. रक्षाताई खडसे, ना.मा. संजयभाऊ सावकारे (वस्त्रोद्योग मंत्री) भाजपा प्रदेश महामंत्री मा. विजयभाऊ चौधरी, मुख्यालय प्रभारी तथा उत्तर महाराष्ट्र विभाग संघटन मंत्री मा. रविंद्र अनासपुरे, खा.मा.स्मितताई वाघ, आ.मा. सुरेशभाऊ भोळे (राजूमामा), आ.मा. मंगेशदादा चव्हाण, आ.मा. अमोलदादा हरिभाऊ जावळे जिल्हाध्यक्ष भाजपा जळगाव पूर्व श्री.चंद्रकांतभाऊ बाविस्कर निवळणूक प्रमुख जळगाव पूर्व श्री नंदुभाऊ महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत जळगाव महानगर, पश्चिम व पूर्व जिल्हाची वंदे मातरम 150 वर्ष गौरव सोहळा निमित्त दि . ७ नोव्हेंबर २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ९ वा. संपन्न झाला . वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव खुर्द (साकेगाव जवळ) ता.जि. जळगाव*"येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमानंतर संघटनात्मक बैठकीत आगामी निवडनुकीत भाजपाचेच उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्व कार्यकर्यांनी कामाला लागावे असे नामदार गिरीश भाऊ यांनी कार्यकत्यांना ठासून सांगितले . या नियोजन बैठकीला पूर्णवेळ अपेक्षित असून आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे. असे आवाहन करण्यात आले होते . प्रदेश पदाधिकारी आजी माजी आमदार व खासदार जिल्हा पदाधिकारी मोर्चा आघाडी व प्रकोष्ठ जिल्हाध्यक्ष मा.जि.प.सदस्य, मा.पं.स. सदस्य, नगरपालिका नगराध्यक्ष व नगरसेवक जिल्हा परिषद गट प्रमुख व पंचायत समिती गण प्रमुख व प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संखेने हजर होते.



**रावेर (स.गांवकरी)** : जवळच असलेल्या लालबाग (ता. जि. बऱ्हाणपूर) येथील तब्बसुम बी.शेख सादिक (वय ४५) या महिलेला गंभीर आजारातून नवजीवन प्राप्त झाले आहे. त्यांच्या पोटात निर्माण झालेला तब्बल ३५ सेंमी लांबीचा आणि २ किलो ६२० ग्रॅम वजनाचा गोळा शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीपणे काढण्यात आला. ही अत्यंत जटिल शस्त्रक्रिया डॉ. मिलींदकुमार वानखेडे (एम.एस. सर्जन) यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. अतुल भारंबे यांच्या सहकार्याने संपूर्ण शस्त्रक्रियेला तब्बल चार तासांचा कालावधी लागला.

## थोडक्यात बातम्या...

### निरगुडसर ग्रामपंचायतीच्या पाच सदस्यांचे राजीनामे

मंचर (स. गांवकरी) : आंबेगाव तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या निरगुडसर ग्रामपंचायतीच्या पाच सदस्यांनी राजीनामा दिल्याने खळबळ उडाली आहे. राजीनामा देण्याचे कारण समजले नाही. निरगुडसर येथील ग्रामपंचायतीच्या पाच सदस्यांनी आपल्या पदाचा राजीनामा शुक्रवार (ता.०७) रोजी दिला आहे. उपसरपंच संगीता हिंगे यांनी आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा मंगळवार (दिनांक ०४) नोव्हेंबर रोजी सरपंच रवींद्र वळसे पाटील यांच्याकडे सादर केला होता,तो शुक्रवार(ता.०७) रोजी झालेल्या मासिक मीटिंग मध्ये मंजूर करण्यात आला,त्यानंतर संगीता हिंगे यांनी आपल्या सदस्यपदाचा देखील राजीनामा सरपंचाकडे दिला.

### धामणखेल येथे ५३ लाख ७०हजाराची आरटीजीएस द्वारे फसवणूक

शिवनेरी (स. गांवकरी) : धामणखेल येथे बाहेरील राज्यातील नागरिक येथे येऊन शेतकऱ्यांना ५३ लाख ७० हजार रुपये बँकेतील खाते नंबर तसेच आरटीजीएस द्वारे फसवीले आहे. यामुळे या परिसरामध्ये शेतकऱ्यांची सुरक्षा बाबत उलट सुलट चर्चेला उधाण आलेले आहे. जुन्नर पोलीस स्टेशन येथे नवनाथ चिंत्तू रघतवान वय ६३ वर्षे व्यवसाय रिटायर्ड बँक कर्मचारी रा.धामणखेल यांनी फिर्याद दिली की, दि. ९ ऑक्टोंबर २०२५ रोजी दु १/१५ वा. सुमारास मोबाईल क्र. ९८८१४१५३१८ व्हाट्सअप वर व्हिडिओ कॉल वर ९९१२९४९५४७ / ७७ १० ०२ ९६ २५ / ९५ ०३ ८३ १० ७२/ ९० ४६ ९ ४ ७४ ०७ या नंबर वरून वेळोवेळी व्हिडिओ कॉल करून पोलीस असल्याचे वारंवार सांगितले.

# अहिल्यानगर बायपास व नगर–मनमाड महामार्ग विकासकामांसाठी ४.६८ कोटींचा निधी

- खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश
- महामार्ग विकासाला मिळणार गती



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रीय महामार्ग विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अहिल्यानगर बायपासवरील पूरप्रवण भागातील सुधारणा, पूरनियंत्रण तसेच सुविधा विकासासाठी तब्बल ४.६८ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मंजुरी दिली असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.

खासदार लंके यांनी सांगितले की, "ही मंजुरी केवळ निधीपुरती मर्यादित नाही, तर गेल्या अनेक महिन्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे हे फलित आहे. दिल्लीतील मंत्रालयीन चर्चेनंतर अखेर ही कामे मंजूर झाली असून, येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होणार आहे."राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या मुंबई क्षेत्रीय कार्यालयाकडून ७ नोव्हेंबर रोजी जारी आदेशानुसार पुढील प्रमुख कामांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यात सारोळाबद्दी येथे सर्व्हिस रोड व आरसीसी गटार बांधकाम, नारायणडोह, नेप्ती (कल्याण जंक्शन) व पुणे जंक्शन परिसरात आरसीसी गटार कामे, आरणगाव येथे पथदिव्यांची उभारणी, मांडळी–नागमठाण व देहेरे येथील बोगद्यांचे बांधकाम व दुरुस्ती यांचा समावेश आहे.

ही सर्व कामे पुढील १५ ते ३० दिवसांत सुरू होणार असून, संबंधित कंत्राटदार व प्रकल्प संचालक कार्यालयाला यासंदर्भात निर्देश देण्यात आले आहेत.

कुंभमेळा २०२७ लक्षात घेता नगर–मनमाड राष्ट्रीय महामार्ग (रा. मा. १६०) या अत्यंत महत्त्वाच्या मार्गावरील कामांना गती देण्यात आली आहे. हा प्रकल्प मिश्र वार्षिक पद्धत या तत्त्वावर राबविला जात असून, एप्रिल २०२७ पर्यंत पूर्णत्वाचा करार असला तरी डिसेंबर २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. "या महामार्गाच्या कामासाठी मी स्वतः ११ जुलै २०२५ रोजी बेमुदत आंदोलन केले होते. त्यानंतर केंद्र सरकार व एनएचएआय प्रशासनाने तत्काळ लक्ष घालून कामाला प्रत्यक्ष सुरुवात केली," असे खासदार लंके यांनी सांगितले.

सध्या विविध टप्प्यांवर जलद गतीने काम सुरू आहे. त्यात राहुरी ते राहुरी फॅक्टरी विभागातील एक बाजूचे काम पूर्णत्वाकडे, लवकरच वाहतुकीसाठी खुला होईल. कोल्हार – बाबळेश्वर विभाग डांबरीकरणासाठी तयार आहे तर शनिशिंगणापूर फाटा ते विळद बायपास विभागात प्रत्यक्ष काम सुरू असून, प्रकल्प नियोजनाप्रमाणे पुढे सरकत आहे असे खा. लंके म्हणाले.

### आर्थिक आणि सामाजिक प्रगतीची किल्ली

खासदार लंके म्हणाले, "अहिल्यानगर व परिसरातील महामार्ग विकास ही केवळ वाहतूक सुलभतेची बाब नाही, तर ती प्रदेशाच्या आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक विकासाची किल्ली आहे. पूरप्रवण भागातील सुधारणा, सर्व्हिस रोड, गटार व्यवस्था आणि पथदिव्यांची उभारणी यामुळे नागरी जनतेला मोठा दिलासा मिळेल. कुंभमेळा २०२७ पूर्वी हे सर्व काम पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे."

# आयुष्यभर काळ्या आईची सेवा करणारा विराट वटवृक्ष

# किसन (दादा) हांडे

**(समर्थ गांवकरी)**



कै.किसन यशवंत हांडे (दादांचा) जन्म १ मार्च १९४६ रोजी एका सर्वसामान्य कुटुंबात झाला. नऊ वर्षाचे असतानाच त्यांचे वडिलांचे छत्र हरपले. पारतंत्र्याच्या काळात कसेबसे त्यांचे पाचवीपर्यंत शिक्षण झाले. स्वतः एकटे व दोन बहिणी आई ठकुबाई हिने आपल्या या मुलांचा सांभाळ करून चांगले संस्कार केले. घरच्या परिस्थितीनुसार बहिणींचे लग्ने केली. मुलगा थोडा कर्ता झाल्यानंतर गावातीलच आपल्या मामाची मुलगी कृष्णाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांनी लहान वयातच स्वीकारली.

आई ठकुबाई यांच्या संस्काराने व आपले मामा सिताराम पुंजा आंबरे यांच्या मार्गदर्शनाने शेतीतील नांगरणी कोळपणी यासारखी शेतीचे सर्व मशागतीचे कामे आत्मसात करून बंधू कारभारी रामचंद्र हांडे व चुलत्यांन बरोबर शेतात राब राब राबायला सुरुवात करुन शेतीची मशागत करायचे. नांगरणी करणे, कुळव, पाभार,पाळी घालणे अशा सर्व शेतीच्या कामात ते पारंगत होते. आपल्या दोन बैलाच्या मदतीने आपल्या घरच्या शेतीची पेरणी करून इतरांच्या जमिनीत पेरणी करून द्यायचे.

सिताराम गोपाळ आंबरे व दादा पांडू आहेर यांचे मार्गदर्शनाने शेती व्यवसायात त्यांनी चांगली प्रगती केली. *प्रगतशील शेतकरी*म्हणून त्यांनी ख्याती मिळवली. शिक्षणात संधी कमी मिळाल्याने व्यवहारातील अनुभव व कष्टाच्या जोरावर त्यांनी हे साम्राज्य उभे केले. आपले मेव्हणे एस टी महामंडळात कामास असल्याने त्यांच्या शेतीची जबाबदारी त्यांनी स्वीकारून त्यांचीही शेती आपल्या शेतीबरोबर कशी चांगली होईल यासाठी ते नेहमी प्रयत्न करत असत. आपल्या शेतीत त्यांनी ढोर कष्ट करून प्रपंचाचा गाडा चालविला. आदर्श पशुपालन करुन सुरवातीच्या काळात शेतीला जोड धंदा म्हणुन दुध व्यवसाय देखील केला.ते गोपाल दूध उत्पादक संस्थेचे संस्थापक संचालक होते. जवळ जवळ २७ वर्षापासून त्यांना मधुमेहाच्या आजाराने ग्रासले होते. तरी त्यांचे शेतातील अपार कष्ट थांबत नव्हते. मोठा मुलगा बाबासाहेब वडगाव लांडगा येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इंग्रजी विषयाचा शिक्षक आहे. तर दोन नंबरचा मुलगा मोहन उत्कृष्ट शेतकरी आहे. तर तीसरा मुलगा दत्तात्रय अंबिका माता देवस्थानचे विश्वस्त व्यवस्थेत सचिव पदाची जबाबदारी सांभाळली आहे. आज तो विमा प्रतिनिधी आहे. अशाप्रकारे विविध क्षेत्रात योगदान देणारी पिढी त्यांनी उभी केली.

**दिपावलीच्या. काळात आपल्या संपुर्ण परिवारासह आनंदाने दिवाळीचा सण साजरा केला. शेवटचे दोन तीन दिवस आजारी होते. तिनही मुलांनी त्यांची चांगली सेवा केली.गुरवार दि.३१ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांचे निधन झाले. (वय ७९) त्यांच्या जाण्याने एक परिपूर्ण मेहनत करून आयुष्यभर काळ्या आई ची सेवा करणारा मोठा वटवृक्ष कोसळल्याची भावना त्याच्या गणगोतात व्यक्त होत आहे. हांडे परिवाराच्या दुःखात ग्रामस्थ,नातेवाईक व मित्रपरिवार सहभागी झाला आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना.**

**-जगन्नाथ आहेर,गणोरे**

# ओतूर उपबाजारात कांद्याच्या 34,832 पिशवीची आवक

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ओतूर येथील उपबाजारात गेल्या अनेक महिन्यांपासून कांद्याच्या बाजारभावात चढउतार तर कधी स्थिरता पाहायला मिळत आहे. गुरुवार दि. 6 रोजी बाजारनिमित्त शेतकऱ्यांना बाजारभाव वाढण्याची मोठी अपेक्षा होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी या उपबाजारात 34,832 पिशवीची आवक झाली आहे.अशी माहिती जुन्नर बाजार समितीचे सभापती संजय काळे, उपसभापती प्रीतम काळे, संचालक तुषार थोरात व ओतूर उपबाजाराचे व्यवस्थापक सतीश मस्करे यांनी सांगितले. वर्षभर मेहनत करून कांद्याचे उत्पादन घेतले तरी त्याला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी हताश झाले आहेत. कांदा हा महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेतील महत्वाचा घटक असून, त्यावर शेतकऱ्यांचा मोठा महसूल अवलंबून असतो. मात्र, यावर्षी कांद्याला प्रतिकिलो 7 ते 15 रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. उत्पादन खर्च वाढलेला असताना एवढ्या कमी दरामुळे शेतकऱ्यांचे गणित बिघडले आहे.शासनाने कांदा उत्पादकांच्या हितासाठी धोरण आखावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# ५९०० विद्यार्थी आणि २०० अधिकारी कर्मचारी यांनी गायले वंदे मातरम् गीत

**संगमनेर तालुका : (समर्थ गांवकरी)**

वंदे मातरम् गीतास 150 वर्ष पूर्ण झाल्याने संगमनेर येथील भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकुलात जवळपास 5900 विद्यार्थी आणि 200 अधिकारी कर्मचारी यांनी सामूहिक वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन केले. बंकिमचंद्र चटर्जी यांनी 7 नोव्हेंबर 1875 साळी लिहिलेल्या गीतास 150 वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडासंकुलात गीतगायन, देशभक्तीपर गीते, वक्तृत्व स्पर्धा, निबंधलेखन, सांस्कृतिक कार्यक्रम यासारखे विविध उपक्रम शाहीर विठ्ठल उमप शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र संगमनेर यांचे वतीने राबविण्यात आले.




कार्यक्रमारिता प्रांताधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, संगमनेर शहर पोलिस निरीक्षक श्री बारवणकर, योगेश कासट, अविनाश पुलाटे, सुमेध संत, उद्योगपती संदीप फटांगरे, आदींसह प्रशासन अधिकारी जालिंदर खताळ,क्रीडापटू प्रणिती सोमण आदी मान्यवरांसह 26 अधिकारी,164 कर्मचारी, 21 शाळा व त्यांचे 4112 विद्यार्थी, 4 महाविद्यालय व त्यांचे 787 विद्यार्थ्यांसह, तालुक्यातील 10 आय.टी.आय कॉलेज आणि त्यांच्या 1001 प्रशिक्षणार्थी तसेच त्यांचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक, कर्मचारी यांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या विद्यार्थिनींनी वंदे मातरम् गीताच्या अनुषंगाने नाटिका सादर केली. नाटिकेनंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री.ईशान गणपुले यांनी वंदे मातरम् गीताचा अर्थ आणि संपूर्ण इतिहास यावेळी मांडला.

विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती जागृत आणि देशाविषयी प्रेम,आपुलकी,निर्माण होण्याच्या दृष्टीने अतिशय अनमोल असे मार्गदर्शन केले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष तहसीलदार धीरज मांजरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस जी कुमावत यांनी केले.

# जग तिचे एकच रूप पाहते, पण ती जगते दोन आयुष्ये

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतभरात अनेक स्त्रिया अशा लढाया लढत आहेत ज्या जगाच्या नजरेपासून लपलेल्या असतात. काही लढाया ऑफिसच्या बोर्डरूममध्ये घडतात, काही क्लासरूममध्ये, तर अनेक घराच्या चार भिंतींमध्ये — जिथे त्यांचा आवाज अनेकदा दाबला जातो. तरीसुद्धा, या स्त्रिया शांतपणे पण ताकदीने उभ्या राहतात आणि अशी ओळख घडवतात जीशक्ती कोणीही पुसू शकत नाही. या स्त्रीशक्तीच्या भावनेतून प्रेरित होऊनझी टीव्ही सादर करत आहे नवीन



मालिका 'जगद्धात्री' दुहेरी आयुष्य, जिद्द आणि एक स्त्रीच्या अकथित सामर्थ्याची एक हृदयस्पर्शी कहाणी.घरी जगद्धात्रीकडे कोणी फारसे लक्ष देत नाही. ती एक शांत आणिदबलेली अशी स्त्री असून प्रेमापासून वंचित असते. पण जेव्हा ती आपल्या गुप्त रूपात, एजंट जे.डी.म्हणून पुढे येते, तेव्हा ती एक निडर, बुद्धिमान, चिकाटीची आणि अजिंक्यअंडरकव्हर ऑफिसर बनते. तिचे ध्येय दोन भागात विभागलेले आहे: एक म्हणजे जगातील काळ्या गुन्ह्यांविरुद्ध लढणेआणि दुसरे — आपल्या आईच्या गूढ मृत्यूमागचे सत्य शोधून काढत आपल्या घरात जिथे तिला कधीच खऱ्या रूपात पाहिलेनाही तिथे स्वतःची हरवलेली ओळख परत मिळवणे. 'जगद्धात्री' च्या प्रवासात तिच्या सोबत उभा आहे फर्मान हैदरतिचा सगळ्यात जवळचा मित्रशिवायच्या भूमिकेत. लहान वयातच आईवडिलांना गमावलेला शिवाय आपल्या वेदना आपले आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि विनोदबुद्धीच्या आड लपवतो. तिच्यासारखाच तोही अनेकदा दुर्लक्षित राहिला आहे, पण तिच्या माध्यमातून त्यालाही आयुष्याचा खरा अर्थ सापडतो. या उलट शक्तीच्या भूमिकेत तीच त्याची मुक्तिदाता ठरते, जी त्याला स्वतःच्या मर्यादांमधून बाहेर पडायला मदत करते.

# ठिकेकरवाडी : बिबट्याचा घरात प्रवेश

**खोडद : (समर्थ गांवकरी)**



जुन्नर तालुक्यातील ठिकेकरवाडी येथे बिबट्याचा गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात वावर आहे. या परिसरात राहणारे गणेश दिगंबर बर्डे यांच्या घराच्या शेडमध्ये बिबट्याने बुधवार दि. 5 नोव्हेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास प्रवेश केला. त्यावेळी घराचा मुख्य दरवाजा बंद होता. मात्र, घराच्या बाहेरील शेडमध्ये कोंबड्या ठेवल्या होत्या अचानक कोंबड्यांचा मोठ्याने आरडाओरडा ऐकू आला. त्यावेळी बर्डे यांनी खिडकीतून बाहेर डोकून पाहिले तर त्यांना शेडमध्ये बिबट्या फिरताना दिसला. त्यावेळी त्यांचा विश्वास बसेना की हा बिबट्या आहे. त्यांनी तात्काळ या बिबट्याचा व्हिडिओ मोबाईलमध्ये टिपला. व हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित केला. अशा प्रसंगामुळे ठीककरवाडीतील नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# भारतीयांचे बुद्धिवैभव आपल्या देशासाठी अधिक वापरले जावे

## माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांचा तरुणाईला सल्ला; 'आयसीएआय' तर्फे विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

"मूल्यांची जपणूक आणि मूल्यवर्धनास नैतिकता, प्रामाणिकता, तथ्य आणि सत्याची दिली, तर त्यातून चांगल्या संपत्तीची निर्मिती होईल. विविध क्षेत्रांतील विदेशी कंपन्यांसाठी आपले बुद्धीवैभव खर्च होतेच; पण त्यासोबतच या बुद्धीचा वापर आपल्या देशासाठी अधिक प्रमाणात व्हायला हवा," असा सल्ला माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते प्रकाश जावडेकर यांनी तरुणाईला दिला. व्यवसाय करताना स्वतःचे छंद जोपासा, ते तुम्हाला ताणतणावांपासून मुक्त ठेवतील, तुमची एकाग्रता वाढेल. जिज्ञासा, सतत शिकण्याची वृत्ती जागी ठेवा, तुमच्यातील विद्यार्थी जागा ठेवा, असे आवाहनही जावडेकर यांनी केले. दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) बोर्ड ऑफ स्टडीज, 'आयसीएआय' पुणे शाखा व 'विकासा' शाखेच्या वतीने सीए विद्यार्थ्यांसाठी आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनावेळी प्रकाश जावडेकर बोलत होते. महालक्ष्मी लॉन्स येथे आयोजिलेल्या या दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेत देशभरातुन २००० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत.




प्रसंगी 'आयसीएआय' च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे व सीए संजीवकुमार सिंघल, ज्येष्ठ सनदी लेखापाल डॉ. एस. बी. झावरे, विभागीय समिती सदस्य सीए रेखा धामणकर व सीए अभिषेक धामणे, 'आयसीएआय' पुणे शाखेचे अध्यक्ष सीए सचिन मिणियार, परिषदेच्या समन्वयिका व 'विकासा' चेअरपर्सन सीए प्रज्ञा बंब, उपाध्यक्ष सीए प्रणव आपटे, सचिव सीए निलेश येवलेकर, खजिनदार सीए नेहा फडके, कार्यकारिणी सदस्य सीए सारिका दिंडोकर, सीए प्रितेश मुनोत, सीए नंदकुमार कदम, 'विकासा' चे व्हाइस चेअरमन श्रीयस नवले, सचिव संयोगिता कुलकर्णी, खजिनदार वेदांत वेदुआ, सहसचिव प्रांजल देवकर, सहखजिनदार जय येडेपाटील, संपादक वैभव अंभोरे आदी उपस्थित होते.